**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...

दारू... अंमली पदार्थ...

गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्‌अ‍ॅप करा...

दारू... अंमली पदार्थ...

राम राम करा...

501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २९१ वा | गुरुवार, दि. ०३ जुलै २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# मालवाहतूकदारांचा संप सुरु, जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक ठप्प; नागरिकांची गैरसोय

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** जड-अवजड वाहतूकदारांच्या मागण्यांवर मंत्रालयीन पातळीवर मंगळवारी कोणताही तोडगा निघाला नाही. त्यामुळे राज्यभरातील अवजड वाहतूकदार संप बुधवार पासून सुरु झाला आहे. पहिल्या दिवशी मुंबईतील ट्रक, कंटेनर, टेम्पो वाहतुकीवर ४५ ते ५० टक्के परिणाम झाला.

तसेच मुंबईत जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीत २० टक्के घट दिसून आली.

आजपासून मालवाहतूक करणारे ट्रक, टँकर, टेम्पो आणि ट्रेलर चालक बुधवारपासून बेमुदत संपावर गेले आहेत. या संपामुळे राज्यभरातील अन्नधान्य, दूध, भाजीपाला, फुले आणि औषधांसारख्या जीवनावश्यक वस्तूंची वाहतूक ठप्प झाली आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान हा संप सुरू झाल्याने सरकारवर दबाव वाढला आहे. तर सर्वसामान्य जनतेची गैरसोय होण्याची शक्यता आहे. तसेच अत्यावश्यक वस्तूंचा तुटवडा जाणवणार आहे.



महाराष्ट्रातील मालवाहतूक संघटनांनी ई-चलन प्रणालीद्वारे होणाऱ्या दंडवसुलीविरोधात आणि इतर मागण्यांसाठी हा संप पुकारला आहे. परिवहन विभागाने मागण्यांवर ठोस उपाययोजना न केल्याने वाहतूकदारांनी संपाचे हत्यार उपसले आहे. दरम्यान, प्रवासी वाहतूक आणि शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या संघटनांनी तूर्तास संपातून माघार घेतली आहे. दोन दिवसांनंतर संपात सहभागी होण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे असोशिएशनकडून सांगण्यात आले आहे.

अवजड वाहतूकदार संपावर गेल्यामुळे बाजारपेठांमध्ये जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. ग्रामीण आणि शहरी भागात होणारा पुरवठा साखळी खंडित झाल्याने किमतीत वाढ होऊ शकते. सरकारने तातडीने चर्चा करून तोडगा काढावा, अशी मागणी वाहतूकदारांनी केली आहे. अन्यथा, जनजीवनावर गंभीर परिणाम होईल, असा इशारा संघटनांनी दिला आहे.

मालवाहतूकदारांच्या संपामुळे मुंबईत जवळपास ५० टक्के वाहने बंद आहेत. तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतूकित २० टक्के घट झाली आहे. हा संप सुरु राहिल्यास जीवनाश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण होईल.
**- राजेंद्र वणवे,** अध्यक्ष,
जय भगवान ट्रान्सपोर्ट असोसिएशन

मालवाहतूक दारांच्या संपाबाबत परिवहन मंत्र्यांसोबत चर्चा झाली. परंतु या चर्चेत तोडगा निघाला नाही त्यामुळे संप कायम असणार आहे.
**- उदय बर्गे,** अध्यक्ष,
मालवाहतूकदार बचाव समिती

# म्हणे तिसरी मोठी अर्थव्यवस्था!

## बैल परवडेना म्हणून शेतकऱ्याने स्वतःला नांगराला जुंपले

**लातूर (कटूसत्य वृत्त):-** जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था आणि देशात चुहूबाजूंनी विकासगंगा वाहत असल्याच्या बढाया सरकार मारीत असताना शेतीच्या कामासाठी बैल घेणे परवडत नसल्याने लातूरमधील अंबादास पवार या वयोवृद्ध शेतकऱ्याने स्वतःलाच नांगराला जुंपल्याचा हृदयद्रावक प्रकार समोर आला आहे.

विशेष म्हणजे या शेतकऱ्याची वयोवृद्ध पत्नीच औत चालवत आहे. जगाच्या पोशिंद्यावरच अशी हाराकिरीची वेळ आल्याने अवघा महाराष्ट्र हेलावला आहे.



अहमदपूर तालुक्यातील हडोळती येथील अंबादास पवार या 73 वर्षीय शेतकऱ्याकडे 2 एकर 9 गुंठे जमीन आहे. मुलगा पुण्यात किरकोळ काम करतो. त्यामुळे पत्नी मुक्ताबाई, सून, एक नातू आणि नात हे सर्वजणच या शेतीच्या तुकड्यावर अवलंबून आहेत.

उसनवारी करून या शेतकऱ्याने कशीबशी सोयाबीन आणि कपाशीची पेरणी केली. मात्र पिकाच्या आंतरमशागत, कोळपणीसाठी पैसाच हाती नाही.

बैल घेण्याची ऐपत नाही. मजुरीसाठी बैल आणला तर दिवसाचे अडीच हजार द्यायला नाहीत. मग काय चहूबाजूंनी संसारावर आलेले संकट वृद्ध शेतकऱ्याने स्वतःच्या खांद्यावरच घेतले.

# शेतकऱ्यांची ऊसबिले तत्काळ द्यावीत; स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उसाची थकीत रक्कम तत्काळ द्यावी, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. आरआरसीच्या कारवाईबाबत जिल्हाधिकारी उदासीन असल्याचा आरोप यावेळी आंदोलकांनी केला आहे.

ऊस गाळप हंगाम संपून सहा महिन्याचा कालावधी पूर्ण झाला आहे. जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्यांनी अद्यापही ऊसबिले जमा केली नाहीत. त्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने मंगळवारी (ता. १) कृषिदिनी जिल्हाधिकारी कार्यालयावर बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. साखर कारखानदार ऊसबिले देत नसल्याने शेतकऱ्यांना कारखान्याकडे वारंवार हेलपाटे



मारावे लागत असल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने हे बेमुदत आंदोलन सुरू केले आहे.

साखर आयुक्तांनी सोलापूर जिल्ह्यातील गोकूळ शुगर, जयहिंद शुगर, मातोश्री शुगर, सिद्धेश्वर सहकारी, भीमा सहकारी, सहकार शिरोमणी, इंदरेश्वर शुगर या सात साखर कारखान्यावर आरसीसीनुसार कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. शेतकऱ्यांचा सध्या पेरणीचा हंगाम सुरू असताना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मशागत, बी बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांनाना अडचणी येत आहेत. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी साखर आयुक्तांच्या आरसीसी आदेशाची अंमलबजावणी करून तत्काळ ऊसबिले जमा करावीत, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष विजय रणदिवे, विशालसिंह पाटील, मोहसीन पटेल, इक्बाल मुजावर, शहाजी पवार, शहाजी सोमवंशी, मकबूल मुल्ला, नागनाथ सुरवसे, नशिर पटेल, नानासाहेब मोरे उपस्थित होते.

### आरसीसी कारवाईकडे जिल्हाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

जिल्हाधिकाऱ्यांनी आरसीसीच्या आदेशाची अंमलबजावणी करून शेतकऱ्यांना ऊसबिले जमा करायला हवी होती. मात्र, गेल्या तीन महिन्यापासून जिल्हाधिकारी हे आरसीसीच्या कारवाईकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप यावेळी शेतकरी संघटनेने केला.

# माऊली तुम्हाला आणखी काही हवं का?

## झेडपी अधिकाऱ्यांकडून वारकऱ्यांची आस्थेने विचारपूस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे श्री विठ्ठल रखुमाईच्या दर्शनाच्या ओढीने पालखी सोहळ्या बरोबर पायी चालत निघालेल्या वारकऱ्यांची जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी संवाद साधला. माऊली आणखी काही हवं का? असं विचारल्यावर वारकरी म्हणाले साहेब खूप चांगली सोय झाली. अंगदुखीसाठी गोळ्याबरोबर मसाजर ठेवला त्यामुळे आमचे आरोग्य चांगले राहणार असे उत्तर आले.

आषाढी वारीचा सोहळा समीप येऊन ठेपला आहे. संतांच्या पालख्यांचे सोलापूर जिल्ह्यात आगमन झाले आहे. रिंगण सोहळ्याने वारकऱ्यां च्या आनंदाला सीमा राहिलेली नाही. पालखी मार्गावर सर्वत्र माऊली, माऊलीचा गजर सुरू आहे. वारकऱ्यांच्या सोयीसाठी जिल्हा



परिषद व जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. वारकऱ्यांना निवास, आरोग्य, स्वच्छता, शौचालय, स्नानगृह अशा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणा कामाला लागली आहे. या उपरी वारकऱ्यांना काही अडचणी भेडसावत आहेत का हे जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी माळशिरस तालुक्यातील बोरगाव येथे वारकऱ्यांमध्ये जाऊन संवाद साधला. सीईओ जंगम यांनी ज्येष्ठ वारकऱ्यांची संवाद साधून आणखी काय सुविधा करता येतील याची माहिती जाणून घेतली. त्यावर वारकऱ्यांनी प्रशासनाने राबविलेल्या यंत्रणेबाबत समाधान व्यक्त केले. पालखी सोहळ्या बरोबर चालल्याने शरीराला मोठ्या प्रमाणावर थकवा जाणवतो. पाय व अंग दुखीचा मोठ्या प्रमाणावर त्रास होतो. यासाठी बरेच वारकरी पालखी मार्गावर असलेल्या औषध सुविधा केंद्राचा आधार घेतात. अंगदुखीचा सामना करण्यासाठी पेन किलर मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. पण या वेळेस जिल्हा परिषद प्रशासनाने मसाजरची सोय केल्याने पेनकिलरचा वापर कमी झाला. मसाजर मुळे आराम पडल्यामुळे भाविकांनी प्रशासनाचे आभार मानले. पेन किलर च्या साईड इफेक्ट पासूनही चांगले आरोग्य लाभल्याच्या भावना वारकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

मुख्यमंत्री औषधंथाचाही वारकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घेतला आहे. या औषधाला मेडिकल प्रमाणे सजावट केल्यामुळे वारकऱ्यांना औषधालयाचे सहजपणे माहिती झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या या कल्पनेबाबत नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. (पान 2 वर..)

# वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी यंत्रणा सज्ज!

## 8 हजार पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुद्ध एकादशी 06 जुलै 2025 रोजी असून, या आषाढी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिलीय.

आषाढी वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक



नियत्रंणासाठी 8 हजार 117 पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये एक पोलीस अधिक्षक, चार अप्पर पोलीस अधिक्षक, 24 पोलीस उपअधिक्षक, 76 पोलीस निरिक्षिक, 312 सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, 4 हजार 850 पोलीस अंमलदार व 2 हजार 850 होमगार्ड तसेच 05 एसआरपीएफ कंपनी, 7 बीडीएस पथके, आरसीपी दोन पथके, क्युआरटी चार पथके, आपत्कालिन परिस्थिती हातळण्यासाठी प्रशिक्षित 14 कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आहेत. तसेच जलप्रवासी वाहतुकीवर नियंत्रण राहण्यासाठी जलसंपदा विभाग व पोलीस प्रशासनाच्या वतीने 10 ठिकाणी पथके स्थापन करण्यात आली आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, 65 एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी 12 वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण (पान 2 वर..)









# 'पंढरीच्या वारीत अर्बन नक्षली शिरले आहेत'

## मनिषा कायंदेंचा सभागृहात गंभीर आरोप

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूरची वारी जगभरात प्रसिद्ध आहे. या वारीसाठी लाखो वारकरी पंढरीला रवाना झाले आहेत. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेकडो दिंड्या पंढरपूरकडे रवाना झाल्या आहेत, सर्वसामान्य कार्यकर्ते भाविक वारीत जात असतात. मात्र, असं असताना काही अर्बन नक्षलवादी वारीत शिरले आहेत, ही ऐकीव माहिती नसून सबळ पुरावे समोर आले आहेत, असे शिवसेना शिंदे गटाच्या आमदार मनिषा कायंदे यांनी म्हलं आहे. विशेष म्हणजे यावेळी सभागृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे देखील उपस्थित होते. आता, आमदार कायंदे यांच्या वक्तव्यावरुन नवा वाद निर्माण होऊ शकतो अशी शक्यता आहे. आदित्य ठाकरेंनीही याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

(पान 2 वर..)



### मनिषा कायंदे नेमकं काय म्हणाल्या?

देव आणि धर्म या गोष्टी हे लोक मानत नाहीत, तो त्यांचा अधिकार आहे. हिंदू धर्म आणि वारीबद्दल अपप्रचार मात्र केला जातो आहे. हे अर्बन नक्षली लोकांचा बुद्धीभेद करत आहेत. पंढरपूरची वारी अशी आहे जिथे कोणी कोणाला निमंत्रण देत नाही. वेगवेगळ्या बोगस नावाखाली काही संघटना जसे पर्यावरण दिंडी, संविधान दिंडीसारख्या गोष्टी समोर आल्या आहेतस, पथनाट्य करतात, असे शो करतात. एक दिवस तरी वारी अनुभवा, हा माणूस कोण आहे हे तुम्हाला माहिती आहे. सासवड येथे ही लोकं पोहोचतात आणि त्यांच्या वारीचा रुट देखील आहे. त्यांनी जो क्युआर कोड दिलाय तो ब्लॅकलिस्टेड आहे, असं दिसतंय. पंढरपूरच्या वारीचा हे लोक गैरफायदा घेत आहेत, अशी माहिती मनीषा कायंदे यांनी सभागृहात दिली. याबाबत आदित्य ठाकरेंचंही वक्तव्य समोर आलं आहे.

## संपादकीय

# प्रतीक्षा निवडणुकांची

राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समिती आदींच्या निवडणुका कधी कोविडचे कारण देत, तर कधी ओबीसी आरक्षणाचा मुद्दा समोर आणून घेतल्या गेल्या नाहीत. 2020 पासून राज्यात कुठे एकदा तर कुठे दोनदा, तीनदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी करण्यात आली होती; पण या निवडणुका घेण्यात आलेल्या नाहीत.

दरम्यान, जिल्हा परिषद, महानगरपालिकेसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत सुप्रीम कोर्टाने 6 मे रोजी निर्णय दिला. ओबीसींना 2022 पूर्वी असलेले आरक्षण कायम ठेवून सुप्रीम कोटानें राज्य निवडणूक आयोगाला चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार निवडणूक आयोगाने कामाला सुरुवात केली असून प्रभाग रचना फेरबदलाचे कामही अंतिम टप्प्यात आले आहे. तथापि, या निवडणुका कधी होणार याबाबत विविध अंदाज वर्तवण्यात येत आहेत. यातील एका अंदाजानुसार, ऑक्टोबरमध्ये चार टप्प्यांत या निवडणुका पार पडण्याची शक्यता आहे. परंतु काहींच्या मते, या निवडणुका वर्षाखेरीस घेतल्या जातील. तसे झाल्यास राजकीय पक्षांना तयारीसाठी बराचसा काळ अतिरिक्त मिळणार आहे.

निवडणुकांचा कार्यक्रम कधी जाहीर होईल याबाबतची संभ्रमावस्था दूर करीत राज्यातील प्रत्येक पक्षांनी आपापल्या परीने काम करण्यास सुरुवात केली आहे. योग्य वेळ आल्यावर योग्य निर्णय घेऊ असे सर्वच पक्षाचे प्रमुख नेते कार्यकर्त्यांना संबोधित करताना सांगत आहेत. काही जागांवर मैत्रीपूर्ण लढण्याचीसुद्धा तयारी करणे अथवा स्वबळावर याबाबतचा निर्णय करावा लागेल असेदेखील चर्चेत येऊ लागले आहे. कुणाचे काय ठरेल, निवडणुका कधी होणार? कोण कुठे जाणार हे त्या त्या वेळी सांगितले जाईल असे मार्गदर्शन काही नेते कार्यकर्त्यांना करीत आहेत.

सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठी उलथापालथ घडविणारी बातमी सातत्याने जोर पकडत आहे. शिवसेना (उबाठा) आणि मनसे या पक्षांची संभाव्य युतीसाठी पडद्यामागे जोरदार हालचाली सुरू आहेत. त्याचप्रमाणे सध्या राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन्ही गट एकत्र येतील याबाबतही अधूनमधून चर्चा सुरू असतात.

नेते अलीकडे आपापल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित करत असताना सांगतात की स्थानिक नेतृत्व आणि कार्यकर्त्यांची इच्छा असेल तरच निवडणुकांमध्ये युती केली जाईल; अन्यथा त्यांच्या मतानुसार, निवडणुकीला सामोरे जाऊ, हेदेखील वेळोवेळी नमूद केले जाते. त्यामुळे कार्यकर्ते संभ्रमात आहेत.

महाराष्ट्रातला राजकीय खेळ पूर्णपणे बदललेला आहे. एवढेच नव्हे तर खेळाचे नियमही बदललेले आहेत, हे सर्व पक्षांच्या प्रमुखांच्या विचारधारेतून समजून येते. आपण बेरजेचे राजकारण करणारे लोक आहोत. त्यामुळेच लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी सत्ताधारी पक्षासोबत जाण्याचा निर्णय घेतला गेला आहे आणि आपली पक्षीय विचारधारा ही शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांनी चालणारी आहे; सत्तेसाठी काही तडजोडी कराव्या लागतात, कारण शेवटी विरोधी पक्षात बसून आणि घोषणा देऊन चालत नाही, असे उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना चर्चासत्रांमधून सांगत आहेत. दुसरीकडे, याच मूळ पक्षाचे संस्थापक असणारे शरद पवार 'आपल्या पक्षात फूट पडेल असे काही वाटत नव्हते. पण फूट पडली ती काही मूलभूत विचारांमध्ये फरक झाला आणि फूट पडली.

जे राहिले आहेत ते विचारांनी राहिले आहेत. आगामी निवडणुका होतील तेव्हा वेगळे चित्र पहायला मिळेल, त्यामुळे फुटीची चिंता करत बसू नका. कार्यकर्त्यांनी एकसंध राहून जनतेशी बांधिलकी कायम ठेवून काम करावे, असे सांगताहेत.

तसेच जेव्हा तुमच्यासारखे कार्यकर्ते एकत्रित विचारांसह पुढे येतील तेव्हा सत्ता आपोआप येईल. महाराष्ट्रात आपण सत्तेत येऊ अशी परिस्थिती दिसत असल्याची भविष्यवाणीही करताहेत. प्रत्यक्ष निवडणुकांमध्ये कोण बाजी मारेल हे येणारा काळच सांगेल. पण यादरम्यान माळेगाव साखर कारखान्याच्या निवडणुकीत अजित पवारांनी विजयी शह देऊन बाजी मारली आहे.

महायुती असो किंवा महाविकास आघाडी, एकसंधतेने निवडणुकीला सामोरे जाणार का, हा मूळ प्रश्न आहे. याबाबत नेत्यांच्या भूमिकेकडे कार्यकर्त्यांचे आणि राज्याचे लक्ष लागले आहे. गेली तीन वर्षे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकप्रतिनिधीच नाहीये. त्यामुळे दुर्सया-तिर्सया फळीतील नेते, कार्यकर्ते यांच्यासाठी निवडणूक अत्यंत प्रतिष्ठेची असेल.

आम्ही महायुती म्हणून लढणार आहोत असे राज्याचे प्रमुख आणि घटक पक्षाचे प्रमुख नेते म्हणत असले तरी ठिकठिकाणची परिस्थिती याच्याशी विपरीत आहे. अनेक ठिकाणी सामंजस्याने तिकीटवाटप करणे महायुतीला अशक्य होणार आहे. खेळाचे नियम खेळ चालू असताना बदलले जातात, असा निवडणुकीचा तमाशा आहे.

निवडणुकीच्या ऐन धुमाळीत 'मला युतीत घ्या, आघाडीत घ्या आणि बरोबरीचा वाटा द्या,' अशी मागणी करणार्यांची संख्या वाढते. अशा अवचित कार्यकर्त्यांची आणि पुर्ढायांची महाराष्ट्रात कमी नाही. राजकारणात कोण कोणाबरोबर जाईल हे सांगता येत नाही. विविध प्रकारच्या निवडणुकांमध्ये सर्वच राजकारण बदलून गेले आहे.

जुन्या काळातील मूल्यव्यवस्था आणि निकष आता इतिहासजमा झाले आहेत. पूर्वीचे राजकीय प्रतिष्ठेचे मापदंड आता संपले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकारण खरोखरीच अनाकलनीय झालेले आहे. अशा वातावरणात निवडणुकांमधून कार्यक्षम लोकप्रतिनिधींची निवड करून स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायतीपासून तालुका पंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका या सर्व संस्थांचे बळकटीकरण करणे ही काळाची गरज आहे.

सध्या मनपा निवडणुकीसाठी प्रभाग रचनेत मोठा बदल करण्यात आला आहे. हा बदल केवळ तांत्रिक नसून त्याचे दूरगामी राजकीय परिणाम होणार आहेत. विशेषतः सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्षांच्या दृष्टीने मोठ्या प्रभागांचा विचार होत असताना लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यातील अंतर वाढणे, स्थानिक समस्यांकडे बर्यापैकी दुर्लक्ष होणे आणि वेळोवेळी सामाजिक ताण वाढणे हे याचे दुष्परिणाम ठरू शकतात. लोकशाहीच्या प्रक्रियेमध्ये प्रतिनिधित्वाला उत्तरदायित्व आणि पारदर्शकता असणे गरजेचे आहे. परंतु मोठ्या रचनेमध्ये ती हरविण्याची भीती आहे.

प्रभागरचना तयार करताना ती सत्ताधारी पक्षाला अनुकूल होईल अशी केली जाते, असा आरोप होतो. सत्ताधारी पक्षाचा प्रभागरचनेवर वरचष्मा असल्याचे बोलले जाते. मात्र यावेळी प्रभाग रचना करताना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नाले, ओढे, नैसर्गिक प्रवाह, मोठ्या रस्त्यांचा विचार केला जाणार आहे.

पालिकेकडून प्रभाग रचना करताना यंदा माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे पारदर्शकता राखली जाईल असा दावा संबंधित यंत्रणांकडून केला जात आहे. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.

नवीन मतदारांना मतदार यादी, आरक्षण आदी संदर्भात कुठलाही संभ्रम राहणार नाही याबाबत यंत्रणांकडून आवश्यक ती कार्यवाही होणे अपेक्षित आहे. इच्छुक कार्यकर्त्यांचा विचार करताना राज्याच्या सत्तासमीकरणात फुटलेले राजकीय पक्ष एकत्र येणार का, अशा काही प्रश्नार्थक राजकीय वातावरणाचा परिणाम निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारावर प्रकर्षाने होताना दिसून येत आहे.

# हातभर समस्येचं बोटभर उत्तर!

आपल्या आजूबाजूला अनेक समस्या, प्रश्न आ वासून उभे राहिलेले दिसून येतात. हवेचे प्रदूषण वाढले आहे, ओझोन वायूचा थर विरळ होत आहे, अन्नसाखळी विस्कळीत झाली आहे. अशा अनेक पर्यावरणीय समस्या सजीव सृष्टीसमोर उभ्या ठाकल्या आहेत. अमेरिकेची दादागिरी, इस्रायलचा युद्धखोरीपणा, रशियाचा हेकटपणा, चीनची फसवाफसवी यांसारख्या आंतरराष्ट्रीय राजकारणामुळे अनेक देश गरिबी, मागासलेपणा आणि भुकेमुळे त्रस्त आहेत. दहशतवाद, अणुशस्त्र स्पर्धा आणि वाढत्या कुरबुरीमुळे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे.

फक्त आपल्या देशाच्या विचार केला तरी दहशतवाद, नक्षलवाद, जातीय व धार्मिक दंगे यामुळे अनेक वेळा काही भागांतील जनजीवन विस्कळीत होते. गाव असो की शहर, लोकांना दैनंदिन जीवनात पाणीपुरवठा, वीज समस्या आणि वाहतुकीतील अडथळे अशा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. वैयक्तिक जीवनातही आपण सतत अडचणींचा सामना करत असतो. एक प्रश्न सुटतो न सुटतो तोच दुसरा तयार होतो. समस्या मागून समस्या सोडवत पुढे जाणे हेच जीवनाचे खरे सूत्र असते.

काही समस्या मात्र कनभर असतात, परंतु आपण त्या मनभर समजून बसतो. डोकं शांत ठेवून एखादी समस्या हाताळली, तर आपल्याला योग्य आणि सकारात्मक उत्तर मिळते. कुलूप मोठं असलं, तरी त्याची चावी लहान असते; त्याचप्रमाणेच समस्या मोठी वाटत असली, तरी त्यावरील उपाय फार छोटासा असतो. एखाद्या गंभीर आजारावर दररोज घेतलेल्या छोट्याशा गोळीनेही मात करता येते. समाजात असणाऱ्या प्रत्येक समस्येला समर्पक पर्याय असतो. प्रत्येक समस्या सोडवता येते, फक्त त्यासाठी लागणारी इच्छाशक्ती महत्त्वाची असते.

निवडणुकांपूर्वी देशातील, राज्यातील, शहर किंवा गावातील प्रश्नांचा मागोवा घेतला जातो. प्रत्येक पक्ष व त्यांचे उमेदवार हे प्रश्न सोडवण्याची आश्वासने देतात. अशा काळात मतदार म्हणून आपण त्यांच्या भूमिकेचा विचार केला पाहिजे. त्यांच्या वर्तनात, कार्यक्रमात आणि विचारधारेत या प्रश्नांची तळमळ किती आहे, हे तपासले पाहिजे. देशातील आणि परिसरातील समस्या आणि प्रश्नांची उत्तरे आपण मतदान यंत्रावरील बटन 'बोटाने' दाबून शोधतो. याचा अर्थ असा की हातभर प्रश्नांचे उत्तर बोटभर असते. आपण लोकप्रतिनिधीची निवड किती चांगल्या पद्धतीने करतो, यावरून भविष्यकाळातील अनेक समस्या सुटू शकतात आणि सध्याच्या समस्यांचे निराकरण होऊ शकते.


एखादा पूल कोसळतो, काही लोक मृत्युमुखी पडतात; त्यानंतर सर्व देशभरातील पूलांचे ऑडिट सुरू होते. एखाद्या मोठ्या इमारतीला आग लागते, मोठ्या प्रमाणावर जीवितहानी आणि वित्तहानी होते, आणि मग हॉस्पिटल्स व शासकीय इमारतींचे फायर ऑडिट सुरू होते. महिलांच्या बाबतीत एखादी दुर्दैवी घटना घडते आणि त्यानंतर अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून फर्मान निघतात.

'प्रतिबंध हाच उपाय' या पद्धतीने आपण वैयक्तिक आणि सामूहिक जीवनात विचार करत नाही. काही लोकांना प्राण गमवावे लागतात, प्रचंड त्रास सहन करावा लागतो, तेव्हा कुठे उपाययोजना केल्या जातात. एखाद्या चौकात वारंवार अपघात होतात, आणि जीवितहानी होते, मग प्रशासनाच्या लक्षात येते की इथे स्पीड ब्रेकर हवा होता. पण तो स्पीड ब्रेकर काही लोकांचे हातपाय मोडल्यानंतर किंवा प्राण गेल्यानंतर बसवला जातो. तोच स्पीड ब्रेकर वेळेवर बसवला असता, तर अनेकांचे प्राण वाचले असते—ही हळहळ फक्त संवेदनशील व्यक्तींनाच वाटते. खरंतर स्पीड ब्रेकर हे वेगाने येणाऱ्या वाहनांना थोपवण्यासाठीचे बोटभर उत्तर असते. पण वेळेवर सुचत नाही, म्हणून दुर्दैवी घटना घडतात.

'फ्युज' हे घरगुती वीज वापरातील एक अत्यंत महत्त्वाचे सुरक्षा उपकरण आहे. विद्युत प्रवाह मर्यादेपेक्षा जास्त झाला, तर फ्युज वितळतो आणि वीजपुरवठा बंद होतो. त्यामुळे आग लागणे, उपकरणांचे नुकसान किंवा विजेचा धक्का लागण्याची शक्यता टळते. याचाच अर्थ असा की बोटभर असणारे फ्युज हे हातभर असणाऱ्या समस्येवर उपाय ठरते.

दोन व्यक्तींमधील किंवा गटांमधील वादांवरही बोटभर उत्तर असते. पण काही लोक जाणीवपूर्वक वाद वाढवत असतात. मालमत्तेसाठीचे तंटे असोत किंवा प्रतिष्ठेसंदभार्तील वाद असोत—सामोपचाराने आणि सुसंवादातून ते सोडवता येतात. अशा वेळी दोघांनी समोरासमोर बसून चर्चा करणे आवश्यक असते. म्हणजेच दोन व्यक्तींमधील किंवा दोन देशांतील वाद हे बोटभर ' चर्चा ' या शब्दातून मिटवले जाऊ शकतात. युद्ध, रक्तपात, निरपराधांची हत्या, वित्तहानी आणि येणाऱ्या अनेक पिढ्यांचे होणारे नुकसान यांसारख्या हातभर गंभीर समस्यां चर्चेमुळे उद्भवूच शकत नाही.

म्हणूनच माझे मत आहे की, हातभर समस्यांवर बोटभर उत्तर शोधण्याचा आपण सातत्याने प्रयत्न केला पाहिजे. असे उत्तर नक्कीच सापडते...



**किशोर जाधव,** सोलापूर
- मो. नं. ९९२२८८२५४१

पान १ वरून

## माऊली तुम्हाला...

**दोन दिवसात 24 हजार वारकरी**

पालखी मार्गावर उपलब्ध केलेल्या फूट मसाजर सेवा केंद्राची दोन दिवसात 24 हजार वारकऱ्यांनी लाभ घेतला आहे. वारकऱ्यांनी फूट मसाजर मशीनचा वापर केला ती संख्या पुढील प्रमाणे आहे.

» दि 30 जूनः धर्मपुरी - 2148,
» कारूडे - 4878,
» शिंगणापूर फाटा -840, नातेपुते -1617,
» वारकऱ्यांनी फूट मसाजर मशीन चा वापर केला संख्या संध्याकाळी दहा पर्यंत (सेंटर वाईज)
» दि. 1 जुलैः मांडवे-शिंगणापूर पाटी-635, सदाशिवनगर पेट्रोल पंप-380,
» सदाशिवनगर जुने रिंगण तळ-523,
» माळशिरस-3510,खुडूस -780,
» अकलुज - 662, संग्राम नगर- 1280,यशवंतनगर :-895
» दि 2 जुलैः विजोरी 634,जैन मंदिर वेळापूर- 880, वेळापूर पालखीतळ- 800,
» बोरगाव- 3567

## वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी यंत्रणा सज्ज!...

देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापन करण्यात आली असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच सुमारे 300 सीसीटीव्ही कॅमेरॅच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण आदी ठिकाणी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे. तसेच वाहतुक नियमनासाठी 14 ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर 17 ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले यांनी केले आहे.

## 'पंढरीच्या वारीत अर्बन नक्षली...

**फेक नरेटिव्ह पसरवणारे हे लोक नाहीत ना?**

मनिषा कायंदे म्हणाल्या काही वारकरी संघटना मुख्यमंत्र्यांना भेटल्या आणि आम्ही देखील सांगितलं ही या गोष्टीला आळा घाला. २०१० आणि २०११ पासून या लोकांवर गुन्हे नोंद आहेत. जामिनावर असलेले लोकं देखील वारीत येत आहेत, अंधश्रद्धा निर्मुलनाच्या नावाखाली हे काही प्रकार सुरु आहेत, असा आरोप करत कायंदे यांनी अंनिसकडे बोट दाखवले आहे. वारीला बदनाम करण्याचा प्रयत्न होतोय, मुख्यमंत्र्यांनी याची गंभीर दखल घेतली पाहिजे. वारीचा गैरफायदा घेऊ नये हाच उद्देश आहे. संविधानाच्या नावाखाली फेक नरेटिव्ह पसरवणारे हे लोक नाहीत ना? असाही सवाल मनिषा कायंदेंनी विचारला.

## जनऔषधी केंद्रांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे तरुणांना कामाबद्दल मिळते माहिती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सर्वांना परवडणारी औषधे आणि निरोगी आणि तंदुरुस्त भारत सुनिश्चित करण्याच्या पंतप्रधान मोदींच्या दृष्टिकोनाच्या अनुषंगाने, तरुणांना जनऔषधी केंद्रांशी जोडल्याने विकसित भारताच्या स्वप्नात योगदान देण्याची एक अनोखी संधी उपलब्ध होत आहे.



भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाशी संबंधित मेरा युवा भारत (माझे भारत) सोलापूर येथील युवा क्लबचे सदस्य, अनुभवात्मक शिक्षण कार्यक्रमांतर्गत बेवार येथील प्रधानमंत्री जन औषधी योजनेअंतर्गत जन औषधी केंद्रात ईएलपी कार्यक्रमाशी जोडलेले आहेत. जन औषधी केंद्राचे प्रभारी म्हणाले की, या ईएलपीमध्ये सामील झाल्यामुळे तरुणांना स्टोअर व्यवस्थापन, सामान्य देखभाल, ग्राहक सेवा आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्र समजून घेण्यात मदत मिळत आहे. जिल्हा युवा अधिकारी राहुल डोंगरे म्हणाले की, तरुणांचे अर्ज माय भारत पोर्टलद्वारे घेण्यात आले. यासाठी, सोशल वर्क अँड रिसर्च सेंटर जवाजा द्वारे तरुणांना प्रेरित करण्यात आले.

१२० तासांच्या या प्रशिक्षण कार्यक्रमात, तरुणांना व्यावहारिक शिक्षण आणि जनऔषधी केंद्रांची कार्ये, रचना आणि उपक्रमांबद्दल माहिती मिळत आहे. हा ईएलपी कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यावर माय भारत सोलापूर स्वयंसेवक प्रसाद खोबरे, अन्नपूर्णा बोगा,धनराज पाटील, पार्थ व्होटकर, आणि यांना माय भारत पोर्टलकडून प्रमाणपत्रे दिली जातील. नेहरू युवा केंद्र संघटनेच्या निर्मितीमध्ये आणि या कार्यशाळेत टीम यादव, चव्हाण आणि यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

## प्रबोधन

# धार्मिकता झाली । भारीच मुजोर

All great men think alike. अर्थात, जगातील सर्व थोरांचे विचार एकमेकांशी खूप जमणारेच असतात, असा एक विचार इंग्रजीमध्ये आहे आणि तो चित्ताकर्षक आहे. या तत्त्वाचा खरेपणा एक थोर कवी, एक थोर राजपुरुष आणि एक थोर व्यासंगी विद्वान यांचे विचार लक्षात घेऊन पारखता येतो. थोर कवी केशवसुत म्हणतात, नियमन मनुजासाठी मनुज नसे नियमनासाठी जाणा म्हणजेच ते जगातील कोणत्याही गोष्टीपेक्षा मनुष्य श्रेष्ठ आहे, असा विचार मांडतात. राजर्षी शाहूंनी आपल्या एका भाषणातून मनुष्य श्रेष्ठ हेच स्पष्ट केलं. ते म्हणाले, 'आम्ही सर्व हिंदी आहोत. बंधू आहोत. हिंदी प्रजाजन कोणत्याही वर्णाचे असोत, कोणत्याही धर्माचे असोत ते सर्व हिंदी आहेत, ते सर्व श्रेष्ठ आहेत. याबाबतीत धर्म ही बाब फार कमी महत्त्वाची आहे.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या काळातील एक कायदेपंडित, अर्थतज्ज्ञ, राजकारण-समाजकारण धुरंधर म्हणून ओळखले जात होते. तेही मनुष्य श्रेष्ठ असंच म्हणतात. ते म्हणाले, ह्यमाणसाकरिता धर्म आहे, धर्माकरिता माणूस नाही. ' म्हणूनच आजही धर्म हा माणसाहून श्रेष्ठ नसतो; तसा होता कामा नये. कारण-

मानवी अस्तित्व। आधी जन्म घेई
त्याच्यामागे येई। धार्मिकता ॥ १
धर्म माणसाने । केला हेच खरे
पोर तेच बरे। माणसाचे ॥२

धर्म हा मनुष्याहून श्रेष्ठ आहे आणि धर्मरक्षण-धर्मप्रसार यासाठी माणसाने प्रसंगी जीवही दिला पाहिजे, असं धर्माच्या दुष्ट प्रभावाखालची लहान-मोठी सर्वच माणसं सतत कंठरवाने अगदी बेंबीच्या देठापासून सांगत असतात. पण सर्वसामान्यांपासून मध्यमवर्गापर्यंत सर्वांना धर्म म्हणजे देवपूजा, सोवळे-ओवळे, गंध-शेंडी, नामस्मरण, तीर्थयात्रा, अशा बाह्य कर्मकांडापलीकडे काहीच माहीत नसतं. लोकहितवादी देशमुख अशा धर्मावर कडाडून हल्ला करताना म्हणतात, 'कोणी म्हणतो की मी कार्तिकमासी निरांजने दिली. कोणी म्हणतो की, मी वैशाखात मडकी दिली. आवळे दिले. हा धर्म कशाचा? हा मूर्खपणा आहे.' मग धर्म कोणता? 'आंधळ्यास जेवावयास घातले काय? दीन गरिबास (ब्राह्मणास नव्हे) वस्त्रे दिली काय? अज्ञान्यास ज्ञानी केलं काय? दुर्जनास सुजन केले काय? कोणता परोपकार आपले लोकांमध्ये त्यांनी केला? धर्म त्यावरून ठरतो.'

पण समाज धर्माच्या दया, क्षमा, शांती, परोपकार, चारित्र्य, सहकार्य, सहिष्णुता या तत्त्वांचा विचार न करता स्वधर्म प्रेमाने अंध होऊन परधमार्चा हिंसकतापूर्ण द्वेष तर करतोच आहे. शिवाय कर्मकांडी जीवनात गुरफटून स्वतःचं अकल्याणही करतो आहे. कसं ते पाहा-

धर्माने माणसा । पहा हो वेढले
पुराने वेढले । जसे घरा ॥ १
धार्मिकता झाली । भारीच मुजोर
माणूस लाचार । तिने केला ॥२
लाडावले पोर । छळते बापाला
तसा माणसाला। छळी धर्म ॥३
नादान पोरांनी। कोंडावे बापाला
तसा धर्म झाला । छळवादी ॥४
अजगर घाली । भक्ष्याला विळखा
समाजाला देखा। गिळी धर्म ॥५

आज समाजाचं धर्माकडून सं-गठन केलं जात आहे; की विघटन केलं जात आहे, हे सांगण्याची गरज नाही. धर्मजन्य युद्धं, धर्मांधांचे अतिरेकी चाळे, जगाचं भवितव्य अंधारमय करण्यात गुंतलेलं असून जगाला वाचवायचं असेल, तर साऱ्या जगानेच आता आपापल्या धर्माचं विसर्जन करून मानवतावादाच्या निरोगी जोपासनेसाठी धर्महीन आणि नीतियुक्त समाजनिर्मिती करणं आवश्यक आहे. 'माणुसकी हाच माझा धर्म आहे आणि समाजसेवा हाच माझा देव आहे.' असं पंडित नेहरू म्हणत असत.

आज धार्मिकता हा अतिसंवेदनशील विषय करण्यात काही समाजकंटकांना दुर्दैवी यशप्राप्ती झाली आहे. परखड धर्मचर्चा कुणी करू धजत नाही. लोकहितवादी देशमुख, महात्मा फुले आणि प्रबोधनकार ठाकरे यांच्यासारखं धर्मविषयक लेखन करून समाजाच्या धर्मांध दृष्टीच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालण्याचं धाडस लोप पावत आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे म्हणाले होते, 'ज्यामध्ये मुक्त चिंतनाला, चिकित्सक दृष्टीला व स्वतंत्र विचाराला वाव नाही, तो धर्मच होऊ शकत नाही.' त्यांचे विचार आचरणात आणण्याची हिंमत समाजाने का दाखवू नये? धर्मचिंतनाच्या रणक्षेत्रात कंबर कसून पाय घट्ट रोवून उभा ठाकणारा पुरुष स्वप्नातही सापडू नये, इतकी धार्मिक विस्फोटकतेची दहशत वैचारिक क्षेत्रात निर्माण होणं बरं आहे का? हा एक प्रकारचा नैतिक, वैचारिक, अधःपात नव्हे का? बरं, दैनंदिन जीवनाचा धमार्शी पूर्वीही फारसा संबंध नव्हता आणि आजही तो नाही. लोकांना निसर्गतः धार्मिकतेचं विस्मरण होत असतं. पण धमार्चे दलाल धर्मस्मरण वाढावं, अखंड राहावं म्हणून रात्रंदिवस क्रियाशील राहातात. नव्या बाटलीत जुनी दारू घालणे या म्हणीनुसार, जुन्या कर्मकांडाचे नव्या पद्धतीने पुनरुज्जीवन करून समाजाच्या कार्यक्षमतेची माती करतात. म्हणून-

धमार्चा संबंध । तोडा बरे आधी
धर्मजन्य व्याधी । करा नष्ट ॥ १
थारा नको धर्मा । मनात-जनात
धर्म हाच घात। जगाचा या ॥ २

हा धर्मत्यागाचा उपदेश व्यक्ती आणि समाज यांचं कल्याण करणारा आहे.



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# बार्शी उपसासिंचन योजनेतून माढा तालुक्यातील गावांना पाणी सोडावे - रणजितसिंह शिंदे

**माढा (कटूसत्य वृत्त):-** सध्या उजनी धरणात 70% च्या आसपास पाणीसाठा उपलब्ध आहे. पावसाळा ऋतू सुरू असल्याने धरणातून भीमा-सीना बोगदाद्वारे मागील काही दिवसांपासून पाणी खाली सोडले जात आहे.हे नाहक वाया जाणारे पाणी जोड कालव्यातून कार्यान्वित केलेल्या बार्शी उपसासिंचन योजनेतून माढा तालुक्यातील भूमिगत पाईपलाईनचे काम पूर्ण व उन्हाळ्यात टेस्टिंग चाचणी यशस्वी झालेल्या गावांना सोडून तेथील पाझर व साठवण तलाव,सिमेंट बंधारे, ओढे व शेततळी पूर्ण क्षमतेने भरण्याची मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे अमेरिकेतून फोनवरून जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह यांनी केली आहे.

मे व जून महिन्याच्या सुरुवातीला पावसाने समाधानकारक हजेरी लावली परंतु मागील काही दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात येऊ लागली आहेत.



ऊस व फळबागांची संगोपन करणे अवघड झाले आहे.या पार्श्वभूमीवर बार्शी उपसासिंचन योजनेतून माढा तालुक्यातील अंजनगाव उमाटे,वडाचीवाडी (अं.उ),जामगाव, तांदूळवाडीचा काही भाग व दारफळ सीनाच्या पूर्व भागातील पाझर व साठवण तलाव,बंधारे,ओढे,नाले व शेततळी पूर्ण क्षमतेने भरून घ्यावीत जेणेकरून शेतीतील उभी पिके व फळबागांचे संगोपन होईल. सीना नदीतून सध्या मोठ्या प्रमाणावर नाहक वाहून जाणारे पाणी या कमी पावसाच्या भागातील विविध जलाशयात सोडले तर भूजलपातळी वाढण्यास नक्कीच मदत होईल.या भागातील शेतकऱ्यांनीही आमच्याकडे पाणी सोडण्याची आग्रही मागणी केली आहे.ही वस्तुस्थिती उपमुख्यमंत्री अजित पवार व जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे रणजितसिंह शिंदे यांनी सांगितली तेंव्हा उपमुख्यमंत्री व पालकमंत्री यांनी सकारात्मक भूमिका घेऊन उजनी धरण व्यवस्थापन विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत त्यामुळे येत्या काही दिवसांत बार्शी उपसासिंचन योजनेतून माढा तालुक्यातील विविध गावांना भूमिगत पाईपलाईनद्वारे सीना नदीतील पाणी मिळणार आहे. उन्हाळ्याच्या आवर्तनाच्या वेळी फक्त यशस्वी टेस्टिंग झाली होती परंतु सर्व पाझर व साठवण तलाव,ओढे,नाले, बंधारे भरले नव्हते त्यामुळे हा भाग पाण्यापासून वंचित राहिला होता.किमान आता तरी उजनी धरणात भरपूर पाणीसाठा उपलब्ध आहे त्यामुळे बार्शी उपसासिंचन योजनेतून पाणी सोडून या भागाला न्याय द्यावा अशी मागणी रणजितसिंह शिंदे यांनी केली आहे.

## वात्रटिका

### वाघाची डरकाळी

चित्रातल्या का असेना पण
वाघाची डरकाळी आहे...
राजकीय सण गाजतात
शिमग्यानंतर होळी आहे...
कवितेला कवितेनेच
खडसावून उत्तर आहे...
राजकीय दर्प सुटलेला
त्यावर वाचाळाचे अत्तर आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# राणीताई बनपट्टे यांनी उमटविला कर्तुत्ववान कार्याचा ठसा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील सामाजिक कार्यकर्त्या, राणीताई बनपट्टे यांनी समाज कार्यात उत्तुंग भरारी घेत, त्यांनी कर्तुत्ववान कार्याचा ठसा उमटविला आहे.

सहकार महर्षी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अकलूज नगरीत, राणीताई बनपट्टे यांचा जन्म झाला. आयुष्यभरासाठी वाट्याला आलेल्या, अपंगत्वावर मात करत, थोर मोठ्यांचा आदर्श घेत, सामाजिक कार्याचे धडे घेतले.

जिथे चुकीचे दिसत आहे, तिथे आम्ही गप्प बसणार नाही! चुकीच्या प्रवृत्ती विरुद्ध आमचा लढा असेल, म्हणूनच आम्ही समाजसेवेचा विडा उचलून, जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न करत आहे असे ठणकावून सांगणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या राणीताई बनपट्टे यांचे सर्वस्तरातून कौतुक होताना दिसत आहे.

नियतीने जन्मताच अखंड आयुष्यासाठी, अपंगत्व दिले. परंतु यामुळे निराश न होता प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर राणीताई बनपट्टे यांनी उत्कृष्ट समाज कायार्ची धुरा सांभाळली. त्यांनी लोक कल्याणकारी असे अनेक विधायक कार्य करून दाखवले व दाखवत आहेत. समाजकार्य करीत असताना, अत्यंत पारदर्शकपणे अंमलबजावणी करत, राणीताई बनपट्टे यांनी माळशिरस तालुक्यातील पंचक्रोशीत आपल्या कायार्चा ठसा उमटविला, आणि तमाम महिला भगिनीसाठी त्या आदर्श ठरल्या. कोरोना मध्ये त्यांनी अविस्मरणीय असेच कार्य केले, परंतु केलेल्या कार्याची प्रसिद्धी केली नाही.

संयम, नम्रता, शिस्तप्रिय आणि समस्त समाजासाठी धाऊन जाणाऱ्या राणीताई बनपट्टे या समाज कार्याशी एकनिष्ठ राहिल्या. सामाजिक पटलावरील रणरागिणी म्हणून राणीताई बनपट्टे यांना ओळखले जात आहे. सध्या त्यांच्या वाट्याला विविध प्रकारचे सामाजिक पदे आलेत परंतु त्या पदांचा कधीच त्यांनी गर्व बाळगला नाही. आज त्या अत्यंत प्रामाणिकपणे स्वस्त धान्य दुकानही चालवतात, तुम्ही स्वस्त धान्य दुकान चालवता, यातून सामाज कार्यासाठी वेळ कसा काढता? असा प्रश्न त्यांना विचारला असता त्या म्हणाल्या की, स्वस्त धान्य दुकान चालविणे सुद्धा समाजसेवाच आहे. स्वस्त धान्य वाटप करताना अनेक महिला भगिनी त्यांच्या समस्या व्यक्त करतात, त्यांच्या अडचणी सांगतात.

त्यांच्यासाठी धाव घेऊन, त्यांचे प्रश्न सोडविणे हे समाज कार्यच झाले. यामुळेच, जणकल्याणासाठी, समाजसेवेसाठी, सदैव तत्पर असणाऱ्या राणीताई बनपट्टे यांची समाजसेवे बद्दलची आत्मीयता दिसून येते.



सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील यांनी सोलापूर जिल्ह्याचे नंदनवन केले. राज्याचे ज्येष्ठ नेते आदरणीय विजयदादासाहेब यांचा राज्याच्या विकासात सिंहाचा वाटा आहे, त्यांचे कार्य प्रेरणा देणारे आहे. शिवाय आमदार रणजितसिंह (दादा) मोहिते पाटील, खासदार धैर्यशील (भैय्यासाहेब) मोहिते पाटील व अकलूजचे सरपंच शिवतेजसिंह (बाबा) मोहिते पाटील हे तीन रत्न अमूल्य, अनमोल आहेत. यांचेकडून समाज कायार्ची प्रेरणा मिळत आहे. यापुढे यांच्या मार्गदर्शनाखाली समाजासाठी काम करत राहणार आहे.

**- राणीताई बनपट्टे,** सामाजिक कार्यकर्त्या अकलूज

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ३६२/२०२५

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनियर डिव्हीजन शिलवंत सो यांचे कोर्टात**

१. श्रीमती यालव्वा नारायण कुंचिकोरवे (आई)
वय ७२ वर्षे, व्यवसाय :-गृहिणी
रा.६० फीट रोड, माटुंगा, लेबर कॅम्प कुंचिकोरवे नगर, धारावी, मुंबई ४०००१७ **}अर्जदार**
२ श्रीमती सुनकाम्मा गंगाराम कुंचिकोरवे (पत्नी) **}सामनेवाला**
वय ५० वर्षे, व्यवसाय :-गृहिणी
रा. रुम नं - ७६/१, संतोष सीएचएस,६० फीट रोड, मुंबई ४०००१७
वय ३४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३ नारायण गंगाराम कुंचिकोरवे (मुलगा)
वय ३४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.ए/ ७६१, कुंचिकोरवे नगर, संत कबीर रोड, इंद्रा नगर, मुंबई ४०००१७
४ रेणू गंगाराम कुंचिकोरवे (मुलगी)
वय ३२ वर्षे, व्यवसाय :-गृहिणी
रा. रुम नं. ७६/१, संतोष सी एच एस, ६० फीट रोड, छोटा सायन हॉस्पिटल जवळ
धारावी, मुंबई, ४०००१७
**//विरुध्द //**
कोणी नाही

ज्याअर्थी अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेसाठी हल्लीचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नं.१ ते ४ हे मयत गंगाराम नारायण कुंचिकोरवे यांचे कायदेशीर वारसदार आहेत, सदर मयत गंगाराम नारायण कुंचिकोरवे यांचे नांवे, डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगर पालिका हद्दवाढ भागातील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं.२३१ यासी नविन सर्व्हे नं.२७ यापैकी श्रमजिवी नगर म्हणून ओळखले जाणारे येथील प्लॉट नं.१ यासी सोलापूर महानगर पालिका मिळकत क्र.६६०९६८ असा आहे. या प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ १२०० चौ.फुट अथवा १११.५२ चौ.मीटर इतकी असून या प्लॉट जागेवर विटा, वाळु, सिमेंट यांनी बांधलेले १०१० चे दोन खोल्या आहेत. यात चालू लाईट मिटर कनेक्शनची (ग्राहक क्र.३३०२४११०४४७८) सोय आहे. ही मिळकत आहे.सदर मिळकतीचे सोलापूर महानगर पालिका कर आकारणी रेकॉर्डला अर्जदार नं. १ ते ४ यांचे वारस नोंद होणेकरिता अर्ज केले असता अर्जदार नं. १ ते ४ हेच गंगाराम नारायण कुंचिकोरवे यांचे वारस असलेबाबत योग्य त्या न्यायालयातून वारस प्रमाणपत्र आणण्यास सांगितले असून अर्जदार हे वरील मिळकतीचे वारसदार म्हणून जाहीर होऊन वारसा प्रमाणपत्र त्यांचे नांवे मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणांस वरील अर्जदारास प्रमाणपत्र देण्यांस काही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आंत किंवा नेमलेली ता.२५/०७/२०२५ रोजी मे,कोर्टात हजर रहावे, तसे न झाल्यास अर्जदार नं. १ ते ४ यांच्या नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. तद्नंतर कोणाचीही हरकत व तक्रार चाणार नाही. ही जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिली असे.

ही जाहीर प्रसिध्दीकरण दिली ता.३/७/२०२५

**लिपिक** (शिक्का) **सही/- सहा.अधिक्षक सि.ज.सि.डि.सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ९३७/२०२५ नि.०६

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर मे कंखरे साो.,यांचे कोर्टात**

१) उत्तम आनंद उर्फ आनंदराव कोळी
वय : ६२ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त
२) शेवंता गणपत कोळी **}अर्जदार**
वय :७५वर्षे, धंदा : घरकाम
३) विठाबाई नारायण कोळी
वय : ६०वर्षे, धंदा : घरकाम
तिघे रा.मु.पो.बाणेगाव,ता.उत्तर सोलापूर,जि.सोलापूर.
**विरुध्द**
कोणी नाही **}सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) मिळणेसंबंधीचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नं. १ ते३ यांचे यांचे वडिल मयत आनंद उर्फ आनंदराव तुकाराम कोळी हे दि.१९/१२/२००८ रोजी मौजे बाणेगाव, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथे निधन झाले आहे. त्यांचे नांवे डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी, मौजे बाणेगाव येथील शेतजमीन गट नं.३०, यासी क्षेत्र १हे ७२ आर, यासी पो.ख.०हे ०२आर, असे एकूण १ हे ७४ आर, यांसी आकार १रु.७५ पैसे इतकी असून ही शेतजमीन आहे. अर्जदार नं.१ ते ३ यांचे नांवाची नोंद मिळकतींचे दप्तरी होणेकरिता अर्जदार हे मयताचे मृत्युपश्चात वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) मिळणेबाबत सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट चे कलम ३ प्रमाणे वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अगर नेमलेली तारीख ०७/०८/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आज दि.०३/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन दि. न्यायालय वरिष्ठ स्तर, सोलापूर.**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ४८६/२०२५ नि.०६

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन साो,श्रीमती व्ही.ए.कुलकर्णी याचे कोर्टात**

१) सुगराबी मखदुमसाहेब मुल्ला,
वय : ६९ वर्षे, धंदा : काही नाही,
रा.घर नं.१२२बी, गजानन नगर, मजरेवाडी, सोलापूर. **}अर्जदार**
२) सायेरा अब्दुल लतीफ शेख, वय : ५२ वर्षे,
धंदा : घरकाम,
रा.फ्लॅट नं.१०३, लोखंडवाला हेरीटेज, काजल नगर, मजरेवाडी,
सोलापूर.
**।। विरूध्द ।।**
कोणी नाही **}सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. १ व २ हे सख्ख्या बहिणी असून मयत मखदुमसाहेब गौससाब मुल्ला यांचे मुली आहेत. तसेच समसुनीसा मखदुमसाहेब मुल्ला ही अर्जदार नं.१ व २ यांची आई आहे. अर्जदार नं.१ व २ चे जनक पिता मखदुमसाहेब गौससाब मुल्ला यांचे दि.२६/०३/२०१८ रोजी निधन झालेले आहे. तसेच समसुनीसा मखदुमसाहेब मुल्ला यांचे दि.२६/०४/२००० रोजी यापूर्वीच निधन झालेले आहे. मयत मखदुमसाहेब गौससाब मुल्ला हे दारूबंदी कार्यालय, सोलापूर येथे नोकरीस होते. मखदुमसाहेब गौससाब मुल्ला यांचे मृत्यूपश्चात शासकीय परिपत्रकाप्रमाणे अर्जदार नं.१ हिस कुटूंब निवृत्ती वेतन मिळणेकामी हेअरशीप सर्टिफिकेट (वारस प्रमाणपत्र) अर्जदार नं.१ व २ तर्फे अर्जदार नं.१ हिचे नांवे मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याआर्थी यातील अर्जदार नं.१ व २ हे मयताचे जवळचे वारस नाहीत अथवा अन्य कोणी आहेत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमलेली तारीख ०६/०८/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून आपल्या हरकती नोंदऊन वर नमुद वेळेत कोणाची हरकत आली नाही तर सदरचे मे.कोर्ट अर्जदारांचे नावे हेअरशिप सर्टीफीकेट देण्याचा हुकूम करेल. त्यानंतर कोणाची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता.०३/०७/२०२५

**क.लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन सहा.अधिक्षक, सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: २१२/२०२५ नि.०६

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर मे एम.पी.मर्ढेकर सो, यांचे कोर्टात**

वाहेद रफिक शेख, वय- ४४ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
रा. हनुमान मंदिर जवळ, कन्नी नगर, **}अर्जदार**
दहिटणे, हैद्राबाद रोड, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर
**विरुध्द**
कोणी नाही **}सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांचे आई नुरजहाँबेगम रफिक शेख ही दिनांक १८/०६/२०१५ रोजी सोलापूर येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार यांचे वडील रफिक कासिम शेख ही दिनांक २९/१२/१९८८ रोजी मयत झालेले आहेत. मिळकत वर्णन: डि।। व सब डि।। सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी, शहर सोलापूर महानगरपालिका नवीन हद्दवाढ भागातील दहिटणे येथील विभाग क्रमांक ३५/२ मधील सर्व्हे नंबर १७/२ अ पैकी कन्नी नगर या नावाने ओळखले जाणारे नगरातील प्लॉट नं. आय पूर्व याचे हद्द पूर्व-पश्चिम १० मीटर व दक्षिणोत्तर ९ मीटर असे एकूण क्षेत्र ९०.०० चौ.मी. असून यात ९.२९ चौ.मी. चे कच्चे बांधकामाची एक खोली आहे व बाकीची खुली जागा आहे. यांसी सो.म.पा.मिळकत क्र. ५२१७१४ असे असून यासी चतु:सिमा खालीलप्रमाणे - पूर्वेसः रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नंबर आय पैकी राहिलेली जागा, उत्तरेसः प्लॉट नंबर एच पैकी, दक्षिणेस : प्लॉट नंबर आय पैकी राहिलेली जागा सदर जागेवर मयत नुरजहाँबेगम रफिक शेख यांचे नांव सो.म.पा. कर आकारणी व कर संकलन कार्यालयात नोंद असून मयताचे नाव कमी करून अर्जदार यांच्या नावाची नोंद सो.म.पा. कर आकारणी व कर संकलन कार्यालयामध्ये लावण्यासाठी आवश्यक असलेले वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्याकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम ३ अन्वये या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा नेमलेली दि. १८/०८/२०२५ रोजी स्वत: अथवा आपल्या वकिलामार्फत लेखी कागदपत्राच्या पुराव्यासह या मे.कोर्टात हजर राहून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. नमूद मुदतीत कोणाची काही हरकत न आल्यास सदरचे मे,कोर्ट अर्जदार यांचे नावे हेअरशिप सर्टिफिकेट देणेचा हुकूम करेल त्यानंतर कोणाची काही हरकत चालणार नाही.

हे आज दि.०३/०७/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिद्धी केले असे.

**सही/- कनिष्ठ लिपिक** (शिक्का) **हुकूमावरून सही/- सहा.अधिक्षक मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ३९२/२०२५

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर चव्हाण मॅडम सो यांचे न्यायालयात**

१) श्री. संजय बाबासाहेब तमशेट्टी
वय ६० वर्षे, धंदा नोकरी,
रा.फ्लॅट नं.२३,साईराज अपार्टमेंट,स.नं.१४/५/२/२, सिंहगड रोड, आनंद नगर,वडगाव बु. पुणे.
२) विश्वनाथ बाबसाहेब तमशेट्टी
वय ५० वर्षे, धंदा - रिक्षाचालक
रा.घरनं.२०३,भारत माता नगर, होटगी रोड, सोलापूर **}अर्जदार**
३) सुवर्णा बाबासाहेब तमशेट्टी (लग्ना पुर्वीचे नाव)
४) सुवर्णा उत्तम माळी (लग्ना नंतरचे नाव)
वय ४२ वर्षे, धंदा घरकाम,
रा. १९५,दक्षता सोसायटी, कृषी नगर,जि.धुळे.
**विरुध्द**
कोणीही नाही **}सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदाराचे मयत वडील कै. बाबासाहेब जगदेवप्पा तमशेट्टी हे दि.१५/०३/२०२३ रोजी मयत झाले असून, त्यांच्या नावे डि व सब डि ता. उत्तर सोलापूर पैकी शहरसोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील मजरेवाडी हद्दीतील जुना सर्व्हे नं. २६८ व नविन सर्व्हे नं.६३ यापैकी भारत माता नगर या नावाने ओळखले जाणारे वसाहतीमधील प्लॉट नं.२०३ व यास सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ विभाग याचा मिळकत क्र.६००१७१ असा असून, याचे क्षेत्र ३०' ३३' असे एकूण ९९० चौ. फुट अथवा ९१.९४ चौ.मी. इतके आहे. सदर जागेवर तीन खोल्या, संडास, बाथरूम वरती स्लॅब लोडबेअरींग पध्दतीचे बांधकाम केलेले आहे. याचे एकूण क्षेत्र ४१.४७ चौ.मी. इतके आहे. यातील लाईट व नळ कनेक्शनसह घर जागा असून त्यांच्या पश्चात वर नमुद कायदेशीर वारसदार आहेत. सदर वारसदाखला मिळण्यासाठी मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाच्याकामी कोणाचीही कसलीही हरकत/अडथळा असल्यास हि जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत किंवा नेमलेली तारीख०२/०८/२०२५ रोजी स्वतः अगर आपल्या विधिज्ञामार्फत हजर राहून आपले लेखी स्वरुपात हरकत/अडथळा मांडावी मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत/अडथळा अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही हरकत/अडथळा अथवा म्हणणे नाही असे समजुन या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास वारसदाखला देण्यात येईल.

ही जाहिर नोटीस दिली तारीख ०३/०७/२०२५

**क.लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन सही/-सहा.अधिक्षक, सि.ज.सि. डिव्हीजन साो, सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ४९८/२०२५ नि.०६

**सोलापूर येथील मे.९ वे दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर(शिलवंत सो)यांचे कोर्टात....**

१) स्वाती मंगेश निमकर वय ४२ वर्षे, धंदा - घरकाम,
२) अर्णव मंगेश निमकर वय १४ वर्षे, धंदा- शिक्षण, **}अर्जदार**
(अर्जदार नं. २ यांची अ.पा.क. म्हणून
जनक आई अर्जदार नं. १) दोघेही रा. घर नं. १८०,
पापाराम नगर, नुतन प्रशालेजवळ, सोलापूर
**विरुध्द**
कोणी नाही **}सामनेवाला**

ज्याअर्थी, अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारसा दाखला मिळणेकरिता दाखल केलेला आहे.अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ चे वडील कै. मंगेश मारुती निमकर हे होते. मंगेश मारुती निमकर यांचे निधन दि. २५/०४/२०२५ रोजी पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटल, शास्त्री नगर, पुणे या ठिकाणी झालेले आहे. कै. मंगेश मारुती निमकर यांचे वडील व अर्जदार नं. १ यांचे सासरे कै. मारुती गणपत कांबळे यांचे निधन दि. ०३/०५/२०१६ रोजी राहत्या घरी म्हणजेच घर नं. १८०, पापाराम नगर, नुतन प्रशालेजवळ, सोलापूर या ठिकाणी झालेले आहे. तसेच कै. मंगेश यांच्या आई व अर्जदार नं.१ यांच्या सासू कै. केशरबाई मारुती कांबळे यांचे निधन दि. २१/१०/२०२१ रोजी सोलापूर येथे झालेले आहे. कै. मंगेश मारुती निमकर यांचे मृत्युपश्चात त्यांची पत्नी व मुलगा म्हणजेच अर्जदार नं.१ व २ हेच कायदेशीर वारसदार असून त्यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही जवळचे कायदेशीर वारसदार नाहीत अगर यातील अर्जदार यांचेशिवाय दुसरा कायदेशीर वारस किंवा प्रतिनिधी नाही. वरील सर्व अर्जदार हे मृत व्यक्तीचे वर्ग-१ कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी मे. न्यायालयाकडून वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणास वरील अर्जदार यांच्या नावाने वारसा दाखला देण्यासंबंधी कांही म्हणणे, हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत अथवा नेमलेली तारीख १४/०८/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांच्या नावाने वारस प्रमाणपत्रास कोणाची कांही हरकत नाही असे समजून अर्जदार यांचे नांवे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

ही जाहीर नोटीस माझ्या सहीनिशी व मे. कोर्टाच्या शिक्यानिशी दिली असे. ता.३/७/२०२५

**क.लिपीक** (शिक्का) **हुकूमावरून सहा.अधीक्षक दि.न्या.व.स्तर.सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ४५६/२०२५ नि.०५

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर मे. एन.ए.मोर साहेब यांचे कोर्टात**

१) मोहमंद वाईस अमिनसाब बागवान
वय:- ५२ वर्षे, धंदा :- मजुरी,
रा. प्लॉट नं. ८०, सिध्देश्वर नगर भाग-४, **}अर्जदार**
नई जिंदगी रोड, सोलापुर
२) म. गौस अमिनसाब बागवान
वय:- ४४ वर्षे, धंदा :- मजुरी,
रां. ३८३, जामे मस्जिद समोर, शुक्रवार पेठ, सोलापुर
**विरुध्द**
कोणी नाही. **}सामनेवाला**

**मिळकतीचे वर्णन:-** डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर व सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढीतील मजरेवाडी येथील 'सिध्देश्वर नगर भाग-४' मधील घरजागा यांसी जुना स.नं. २७१ नवीन सर्व्हे नंबर ५३ पैकी प्लॉट नंबर ८० असे असून याचे एकूण क्षेत्र ८७५ चौ. फुट इतके आहे. सदर घरजागेत तिन रुम संडास बाथरुम, लाईट व नळ कनेक्शनसह असलेली घरजागा असुन उर्वरित जागा ही खुली असुन त्याचा सो.म.पा. सोलापुर येथील मिळकत क्रं. ६४०९०७ यांसी चतुः सिमा येणेप्रमाणे- पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं. ७९, दक्षिणेस :-प्लॉट नं.७७ उत्तरेस :- प्लॉट नं. ८१ येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत आतील सर्व तदंगभूत वस्तुसह व वहिवाटीच्या हक्कासह.

वर नमूद अर्ज कलम १ मध्ये वर्णन केलेल्या घरजागा ही खैरुनिसा अमिनसाब बागवानं यांच्या मालकी कब्जेवहिवाटीची होती व आहे. यातील खैरुनिसा अमिनसाब बागवान हे दिनांक १२/०७/२०२२ रोजी ८०, सिध्देश्वर नगर भाग-४, नई जिंदगी, सोलापुर येथे मयत झालेले आहे. पै. खैरुनिसा अभिनसाब बागवान यांचे पती पै. अमीनसाब म्हताबसाब बागवान हे देखील दि. ३०/०७/२००६ रोजी सोलापुर येथे मयत झालेले आहे. अर्जदार नं. १ व अर्जदार नं. २ ही पै. खैरुनिसा अमिनसाब बागवान यांची मुले आहेत. पै. खैरुनिसा अमिनसाब बागवान यांना अर्जदार नं.१ ते अर्जदार नं. २ यांच्याशिवाय कोणतेही कायदेशीर वारसदार नाही. सदर वर नमूद कलम १ मधील मिळकत ही पै. खैरुनिसा अमिनसाब बागवान यांची मालकी वहिवाटीची असून त्यांच्या वर नमुद कलम १ मधील मिळकतीमध्ये अर्जदार नं.१ ते २ यांचा कायदेशीर वारसदार या नात्याने हक्क प्राप्त होतो.

यातील अर्जदार नं.१ ते २ यांनी पै. खैरुनिसा अमिनसाब बागवान यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारसा दाखला (Heirship Certificate) मिळणेसाठी या मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी पै. खैरुनिसा अमिनसाब बागवान यांना कोणी कायदेशीर वारस असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आंत अथवा पुढील नेमलेली तारीख ०६/०८/२०२५ रोजी स्वतः अथवा प्रतिनिधीमार्फत हजर होवून आपली लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीहि कसलीहि हरकत न आल्यास मे. कोर्ट अर्जदार नं. १ ते २ यांचे नांवे वारसा' प्रमाणपत्र (Heirship Certificate) देण्याचे पुढील हुकूम करतील. त्यानंतर कोणाचीहि कसलीहि हरकत विचारात घेतली जाणार नाही. ही जाहीर नोटीस आमच्या सही व कोर्टाचे शिक्यानिशी आज दिनांक ०३ माहे ०७ इसवी सन २०२५ रोजी प्रसिध्द केली असे.

**क.लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन सहा.अधीक्षक दि.न्या.व.स्तर.सोलापूर**

# पत्रकार प्रशांत माने लिखित 'लोकाभिमुख पत्रकारिता' पुस्तकाचे प्रकाशन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहराच्या आत असलेले विमानतळ किती दिवस टिकणार? आम्ही आडवे घालणार नाही. सत्ता त्यांची आहे त्यांनीच मार्ग काढला पाहिजे. आम्ही कोणत्याही कामाचे श्रेय घेतले नाही. बोरामणी विमानतळासाठी प्रयत्न केले. जागा दिली. आमचे नाव बाजूला ठेवा पण सोलापूर शहराच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीयस्तराचे बोरामणी विमानतळ झाले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी आज येथे व्यक्त केली. संपादक प्रशांत माने हे चिंतनशील पत्रकार आहेत. त्यांचे लोकाभिमुख पत्रकारिता पुस्तक वाचनीय असून नव्या पत्रकारांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले.

पत्रकार प्रशांत माने लिखित आणि जागृती प्रकाशन प्रकाशित लोकाभिमुख पत्रकारिता या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आज रविवारी होटगी रोड गांधीनगर येथील हेरिटेल गार्डन येथे प्रमुख अतिथी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. धनंजय माने, दैनिक तरुण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे, ज्येष्ठ संपादक तथा स्वागताध्यक्ष राजा माने यांच्या हस्ते थाटात पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते.




माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे पुढे म्हणाले, निवडणुकीत ज्यांना विजय मिळेल असे वाटते, तो पडला जातो. सोलापुराकरांनी मला सर्वसाधारण जागेवर दोनदा खासदार केले मात्र राखीव जागेवर माझा पराभव झाला. आम्ही प्रभावीपणे काम केले. लोकांनी ते स्वीकारले नाही. नाराज न होता काम केले पाहिजे. ते आम्ही करत आहोत. लोकशाहीत चिंतन केले पाहिजे. सोलापूरला रंगाअण्णा वैद्य यांच्यासह अभ्यासपूर्ण पत्रकारांचा मोठा वारसा आहे. रंगाअण्णा वैद्य यांनी काल आणि आजच्या पिढीला पत्रकारिता कशी असावी याचा आदर्श घालून दिला. पत्रकार प्रबोधन करणारा असला पाहिजे. त्याचप्रमाणे पत्रकार प्रशांत माने हे चिंतनशील पत्रकार आहेत. तीस वर्षाच्या पत्रकारितेत त्यांनी जे अनुभवले, लिहिले ते त्यांनी पुस्तकातून मांडले आहे. त्यांचे विचार सामाजिक समतेचे आहेत. पत्रकारिता करताना सार्वजनिक जीवनात लोकांना काय पाहिजे ते दिले पाहिजे. तशा उपयुक्त बातम्या देण्याचे काम पत्रकार माने यांनी केले आहे, असे गौरवोद्गार माजी मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी काढले.

माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे की, बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकशिक्षण आणि प्रबोधन केले. पत्रकार प्रशांत माने यांचे पुस्तक नव्या पत्रकारांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. पत्रकारितेचा वारसा नसतानाही त्यांनी तब्बल तीस वर्षात आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक प्रश्न मांडले. महसूल खात्यातील योजनांच्या अनियमिततेवर प्रकाश टाकला. त्याची दखल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी घेतली. त्यावर चर्चा झाल्या. अनुदान थेट बँकेच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही करण्यात आली. पत्रकार सुद्धा चांगल्या गोष्टी करू शकतात हेच या माध्यमातून दाखवून दिले.

दैनिक 'तरुण भारत'चे कार्यकारी संचालक दिलीप पेठे यांनी प्रशांत माने यांच्या कायार्चे कौतुक करत त्यांच्या पुस्तकांने दैनिक तरुण भारतच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे, असे गौरवद्गार काढले. स्वागताध्यक्ष राजा माने म्हणाले, लोकाभिमुख पत्रकारिता हा सोलापूरच्या पत्रकारितेचा आत्मा आहे. विविध विकास कामे आणि प्रश्नांसाठी सोलापूरच्या पत्रकारांनी लोकप्रतिनिधींच्या दहापट शक्ती पणाला लावली. पत्रकारितेतील सुवर्णकाळ आणि अनुभवला आहे. इशू बेस पत्रकारिता राहिली आहे का असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला. आज डिजिटल मीडियाचे युग आहे. बिझनेस मॉडेल पूर्ण बदलले आहे. त्याचा अभ्यास करण्याची गरज आहे. पत्रकारितेचे मूल्य, सामाजिक बांधिलकीचा विसर न पडता कार्यरत राहिले पाहिजे.

लेखक प्रशांत माने यांनी प्रस्ताविकात लोकाभिमुख पत्रकारिता या पुस्तक लेखनामागील उद्देश स्पष्ट केला. या पुस्तकातून बातम्यांची कात्रणे देखील नवोदित पत्रकारांना अभ्यासासाठी प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. पत्रकारांचे राजकीय आणि सामाजिक ऋणानुबंध कसे असावेत ? यावर देखील पुस्तकातून छायाचित्रांच्या माध्यमातून प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. वाचकांसह नवोदित पत्रकारांच्या पसंतीस पडेल, असे प्रशांत माने यांनी सांगितले.

सूत्रसंचालन पल्लवी गंभीरे यांनी केले. अक्षय माने यांनी आभार मानले. याप्रसंगी पत्रकारितेसह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# प्लास्टिक कचरा प्रक्रियेसाठी गोपाळपूर मध्ये अत्याधुनिक मशीन

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी यात्रे निमित्त होणारा प्लास्टिक कचराचे प्रक्रिया करणे साठी गोपाळपूर ग्रामपंचातीने नाविन्यपुर्ण उपक्रम राबवित प्लास्टिक बाटल्यांचे लहान तुकडे करणारी मशीन बसविली आहे. या मशीनचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते करणेत आला. या मशीन मध्ये प्लास्टिक बाटल्या टाकून चाचणी घेणेत आली. याप्रसंगी गट विकास अधिकारी सुशील संसारे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, सरपंच पुष्पा राजेंद्र बनसोडे, उपसरपंच लक्ष्मण लेंगरे, ग्रामपंचायत अधिकारी ज्योती पाटील सदस्य विलास मस्के, उज्वला बनसोडे, मनिषा आसबे, विक्रम आसबे, सविता आसबे, कमलाक्षी गुरव, उदय पवार, गोदाबाई सुर्यवंशी, राहुल माने, सीमा म्हेत्रे, पांडुरंग देवमारे, इकबाल कांबळे, विठ्ठल पडवळे सर्व ग्रामपंचायत कर्मचारी इ उपस्थित होते. या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी ग्रामपंचायती मधील केलेल्या वैद्यकीय सुविधा केंद्र, हिरकणी कक्षाची पाहणी केली.

# करमाळा पोलिसांची कामगिरी; दिवसा घरफोडी प्रकरणातील सोने हस्तगत

**करमाळा, (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील कंदर येथे दिवसा घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. सुमारे १,५०,००० किमतीचे सोन्याचे दागिने त्याच्याकडून हस्तगत करण्यात आले. करमाळा तालुक्यातील कंदर येथील रहिवाशी अभिजीत जीवन सरडे (वय-२७) यांच्या राहत्या घरी दि. ०६/१२/२०२४ रोजी १२ ते २.३० वा. दरम्यान अज्ञात चोरट्याने दरवाज्याची कडी उचकटून त्यांच्या घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरी करून पोबारा केला, त्या अनुषंगाने अज्ञात चोरटे विरुद्ध करमाळा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा निरंतर तपास चालू असताना तपासामध्ये सदरील गुन्हा रामेश्वर जंगल्या भोसले (वय - २५) रा.पांडेगव्हाण, ता-आष्टी, जि-बीड याने केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीस अटक करून चोरी केलेल्या दागिन्यापैकी १,५०,०००/- रु. किंमतीचे सोन्याची कर्णफुले व सोन्याची ठुशी असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. आरोपी रामेश्वर भोसले याच्यावर यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले.




सदरील कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी, करमाळा विभाग अजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रणजित माने, म.सहा.पो. नि गिरीजा मस्के, पो.उप.नि प्रशांत मदने, पो.ह अजित उबाळे, पो.ना वैभव ठेंगल, पो.ना मनीष पवार, पो. शि सोमनाथ गावडे, पो.कॉ योगेश येवले, पो.कॉ मिलिंद दहीहांडे, पो. कॉ अर्जुन गोसावी, पो.कॉ अमोल रंदील, पो.कॉ रविराज गटकूळ तसेच अंगुलीमुद्रा विभागाचे स.पो. नि गळवे व पो.शि व्यंकटेश मोरे सायबर पोलीस ठाणे यांनी केली.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**


**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) दबंग चित्रपटातील एक अभिनेता, सलमानचा भाऊ २) नॅपकिन (मराठीत) ३) तुरूंग (इंग्रजीत) ४) दूध मोजण्याचे प्रमाण ५) अफगाणिस्तानची राजधानी ६) मला ७) रसदार १०) खडबडीत (इंग्रजीत) १२) नशीब (इंग्रजीत) १४) घरातील कपडे व महत्त्वाच्या वस्तू ठेवण्याची मोठी उभी पेटी १५) कापड फाटताना होणारा आवाज १६) भांड्याना कलई करताना वापरतात तो पांढरा खनिज पदार्थ २०) धावपट्ट (इंग्रजीत) २२) ब्रेड (मराठीत) २३) मुलगा (हिंदीत) २६) मेडल (मराठीत) २७) संस्थेचा सदस्य २८) वर्षाच्या सुरूवातीचा महिना ३०) नऊ+आठ ३२) कागदाचा चतुर्थांश भाग, कॉलम ३४) एक अभिनेत्री-*** टंडन ३६) वस्त्र ३७) चौदा दुणे ४०) दृष्टी ४१) अरण्य, एक (इंग्रजीत) ४२) कष्ट करण्याने दमणे ४३) सांडपाणी वाहणारा नाला ४५) पाणी ४८) शाहिराचे वाद्य ४९) निवडणुकीत उमेदवाराला व्होट देणे-**दान

**आडवे शब्द :** १) भारताचे दिवंगत झालेले केंद्रीय अर्थमंत्री ५) कष्ट करणारा श्रमिक ८) श्री लक्ष्मीदेवीचे एक नाव ९) कलिंगडाप्रमाणे एक फळ ११) मनातील खंत १३) लहान मूल १५) बी च्या वरील आवरण, फोलकट १६) स्वर्गच्या विरूध्दार्थी १७) दोन लाकडी वस्तू जोडण्यासाठी त्यामध्ये बसविलेला निमुळता लाकडी तुकडा १८) आईची बहीण १९) मीठाची चव २१) पत्र २४) पाच+दोन २५) ख्रिश्चन धर्मसेविका २६) वाईट अवस्था, दुर्दशा २७) गस उलट लिहा २९) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ३१) कामकाज ३३) नशीब (हिंदीत) ३५) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी प्रसिध्द असलेले पठार ३६) छ. शिवरायांची लढाई पध्दत-गनिमी ** ३७) नऊ दुणे ३८) छंद, आवड ३९) कथेतील पंख असणारी स्त्री ४०) नऊ नाथ देव ४३) किल्ला ४४) वळीव पावसावेळी आकाशात कडाडणारी ४६) लोक ४७) चवीला कडू ५०) कुत्र्याचा जोडीदार ५१) पाण्याचे बाष्परूप ५२) चांदी

## सुडोकु - 291

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 9 | 1 | | 5 | | 6 | 8 | |
| | | | 6 | 8 | 7 | | | 5 |
| 8 | | | | 1 | 3 | | 2 | |
| 4 | | | | | 2 | | | |
| | | 2 | | | 8 | 7 | 6 | |
| | 8 | 6 | 4 | | | 1 | | |
| 3 | | 4 | 8 | | | 2 | 5 | |
| 1 | 5 | 8 | | | | 3 | 4 | |
| | 2 | 9 | | | 5 | | 7 | 1 |

# सन्मानाने आले तर महापालिका निवडणूकांत आम्ही काँग्रेससोबत युती करू- फारूक शाब्दी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापुरात एमआयएम पक्षाची पत्रकार परिषद घेत शहर अध्यक्ष तसेच राज्य कार्याध्यक्ष फारूक शाब्दी यांनी मोठे विधान केले आहे.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीत काँग्रेस पक्षा सोबत युती करणार का ?या प्रश्नावर फारूक शाब्दी यांनी स्पष्ट सांगितलं,काँग्रेसवाले अगर सन्मानाने युती करण्यासाठी आमच्याकडे आले तर आम्ही जरुर युती करू आणि सोबत महापालिका निवडणूका लढू असे जाहीरपणे सांगितलं आहे.त्यामुळे काँग्रेस नेते काय निर्णय घेतील याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

विधानसभा निवडणुकीत दोन वेळा नशीब अजमावणारे फारूक शाब्दी यांना विधानसभा निवडणुका झाल्याबरोबर एमआयएम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असद ओवेसी यांनी फारूक शाब्दीकडे राज्य कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी दिली.दोनच दिवसांपूर्वी परभणी येथे झालेल्या सभेत फारूक शाब्दी याना मुंबई शहर अध्यक्ष पदाची जबाबदारी दिली.फारूक शाब्दी यांच्याकडे सोलापूर शहर आणि मुंबई शहर अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

बुधवारी सायंकाळी एमआयएम पक्षातर्फे मुंबई आणि सोलापूर शहर अध्यक्ष फारूक शाब्दी यांच्या अध्यक्षतेखाली राहत कॉम्प्लेक्स या ठिकाणी पत्रकार परिषद घेण्यात आली.पत्रकार परिषदेत फारूक शाब्दी यांनी सोलापूर शहरकार्यकारिणी जाहीर केली.

# व्हि. आर. पवार सारीज मध्ये नवनवीन साड्यांचा महासेल सुरू - राजेश पवार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्रातील साड्यांचा सर्वात मोठा सेल सर्वात मोठ्या साडी शोरूम मध्ये सुरू असून दजेर्दार अशा नवनवीन साड्यांचा महासेल सुरू झाले असल्याचे व्हि. आर. पवार सारीज चे संचालक राजेश पवार यांनी सांगितले.

अत्यंत नावाजलेल्या चाटी गल्ली येथील व्हि. आर . पवार शोरूम मध्ये सेल सुरू झाला असून यामध्ये पाच ते 70 टक्क्यापर्यंतची महिला ग्राहकांची महाबचत होत आहे. यामुळे पारंपारिक व अत्याधुनिक महिला ग्राहकांनी खरेदीसाठी मोठी गर्दी केली आहे.

या महा सेलमध्ये सुटिंग – शर्टींग, ड्रेस मटेरियल, गाऊन, वन पीस, क्रॉप टॉप, कुर्ती, लेडीज होजिअरी तसेच प्रीमियम साडी, ब्रायडल शालू, पैठणी, काठपदर साडी सारख्या 2400 ते 3000च्या साड्या अगदी पाचशे ते आठशे रुपये मिळत आहेत.

त्यामुळे सोलापूर शहर व परिसरातील ग्राहक तसेच लातूर, धाराशिव, पुणे, मुंबई येथून आलेल्या महिला ग्राहकांनी खास सेल च्या दरात असलेल्या मनपसंद साड्या खरेदी करण्यासाठी व्हि. आर. पवार शो रोम ला आवर्जून भेट देत आहेत.

या महासेल मुळे तरुणींचा मोठया प्रमाणात खरेदीसाठी झुंबड उडाले असल्याचे दिसून येत आहे.

तसेच महिला वर्ग आपल्या आवडीच्या साड्या अगदी कमीत कमी दरात मिळत असल्याने खरेदी करिता गर्दी करीत आहेत. या महाबचत सेल चा लाभ घ्यावा असे आवाहन अमर पवार, महेश पवार, गिरीश पवार यांनी केले आहे.

# केम येथे लोणीकरांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन



**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी भर सभेमध्ये शेतकऱ्यांबद्दल अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन वक्तव्य केले आहे, "तुज्या बापाला पेरणीचे पैसे पंतप्रधान मोदींनी दिलेत", तुज्या आईला, बहिणीला व बायकोला लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आम्ही पैसे देतो. "तुमच्या अंगावरचे कपडे, बूट व चपला आम्हीच दिल्यात" असे वादग्रस्त वक्तव्य भाजप आमदार बबन लोणीकर यांनी केल्यामुळे त्यांच्या निषेधार्थ करमाळा तालुक्यातील केम येथे प्रहार संघटनेच्या माध्यमातून भाजप आ.बबनराव लोणीकर यांच्या प्रतिमेला जोडो मारो आंदोलन करुन त्यांच्याविरुद्ध घोषणा देऊन प्रहार स्टाईलने निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष संदीप तळेकर यांनी म्हणाले की, आमच्या घामाच्या पैशावर देश चालतो, अन्नधान्य आम्ही पिकवतो, आमच्या मतावर तु व तुझा बाप पण निवडुन येतो. अन आमचा बाप काढतो. बबनराव तुझा बाप असेल मोदी जगाचा बाप शेतकरी आहे. हे लक्षात ठेव. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. आम्ही अन्नधान्य पीकवतो म्हणून तुम्ही सर्वजण खाता. भाजप आमदार बबनराव लोणीकर यांना सत्तेची मस्ती आल्याने असे वक्तव्य करण्यात येत आहे,त्याचा निषेध म्हणून प्रहार संघटना करमाळा तालुका अध्यक्ष संदीप तळेकर, प्रहार जिल्हा सरचिटणीस बापू तळेकर, एपी ग्रुप संस्थापक अध्यक्ष अच्युत काका पाटील, उपसरपंच सागर कुरडे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सागर दोंड, ग्रामपंचायत सदस्य विजयसिंह ओहोळ, गोरख काका पारखे, शरद वायभासे, विष्णू तात्या अवघडे, युवा नेते,दादासाहेब पारखे, किरण तात्या तळेकर, सौदागर बिचीतकर, पिनु तळेकर, सुरेश गुटाळ, अविनाश कुलकर्णी, व गावातील व आजूबाजू गावातील सर्व शेतकरी बांधव प्रहार संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजर्षी शाहू महाराजांचे विचार आणि कार्य प्रत्येकासाठी प्रेरणादायी - दशरथ कांबळे



**करमाळा (कटूसत्य वृत्त):–** राजर्षी शाहू महाराजांचे कार्य आणि विचार समस्त बहुजनांसाठी प्रेरणादायी आहेत. या विचारांनीच बहुजन समाजाचा उध्दार होणार आहे. अशा प्रकारचे उद्गार राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त करमाळा शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर न. प. शाळेतील कार्यक्रमात शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथआण्णा कांबळे यांनी काढले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाराजांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमासाठी उपस्थित महिला पालक वर्गाच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमासाठी एस.पी. कांबळे, एल.डी. कांबळे, ॲड. एम.डी. कांबळे, बौद्धाचार्य प्रशांत कांबळे, अशोक जाधव, लक्ष्मण भोसले, शालेय समितीचे अध्यक्ष शिलराज कांबळे, उपाध्यक्ष सौ. रणबागुल, दामोदरे, पत्रकार सिद्धार्थ वाघमारे, पत्रकार प्रशांत भोसले, पत्रकार विशाल परदेशी, पत्रकार विशाल जाधव तसेच शालेय समितीच्या सदस्यांनी व इतर ही पालक वर्गाने कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती.

यावेळी कांबळे पुढे बोलताना म्हणाले कि, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या हयातीत समस्त बहुजन बांधवांना सांगितले होते कि, राजर्षी शाहू महाराजांची जयंती एखाद्या सणाप्रमाणे साजरी करा. महाराजांनी शिक्षणाचे महत्व जाणून विद्यार्थ्यांसाठी शालेय शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले होते. कारण अशिक्षित समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करावयाचे असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. हे महाराजांनी चांगलेच हेरले होते. त्यामुळे महाराजांच्या विचारांवर आणि कार्यावर पाऊल ठेवून, गेल्या अनेक वर्षापासून आम्ही शिक्षणाच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा आमचा छोटासा प्रयत्न करत आहोत. अशा प्रकारचे विचार कांबळे यांनी मांडले.

यावेळी राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊ वाटपाचे नियोजन विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले होते. तर उपस्थित प्रमुख मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे आणि खाऊचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे विविध स्पर्धामध्ये उज्वल यश संपादन करणाया विद्यार्थ्यांचा देखील यथोचित सन्मान करण्यात आला. प्रशालेचे तत्कालीन मुख्याध्यापक राऊत यांची शहरातील इतर नगरपालिकेच्या प्रशालेत बदली झालेली आहे. त्या अनुषंगाने राऊत सर यांच्या कडून प्रशालेला एक प्रिंटर भेट देण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रशालेचे शिक्षक जाधव यांनी केले. तर आभार प्रदर्शन बौद्धाचार्य प्रशांत कांबळे यांनी मानले. सदरचा संपुर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशालेचे जाधव, शेख मॅडम, राऊत इत्यादींनी परिश्रम घेतले.

# पंढरपूर पालखी मार्गालगत बिबट्याचा धुमाकूळ



**कुडुर्वाडी (कटूसत्य वृत्त):–** माढा तालुक्यातील पंढरपूर पालखी मार्गालगत असलेल्या पालवन, उजनी माढा, व्होळे खुर्द या भागात बिबट्याचा तब्बल तीन आठवड्यापासून धुमाकूळ सुरु आहे. बिबट्याने आत्तापर्यंत शेळ्या, मेंढ्या, कालवडी, रेडी अशा एक डझन पेक्षा जास्त पाळीव जनावरांचा फडशा पाडला आहे. चिंतेची बाब म्हणजे हा परिसर पंढरपूर पालखी मागार्शी संलग्न आहे. बिबट्या सदृश्य प्राण्याच्या वावराच्या ठिकाणापासून श्री क्षेत्र आरण हे केवळ सात किलोमीटरच्या अंतरावर आहे. त्याचप्रमाणे श्री क्षेत्र कुर्मदास हे सुद्धा केवळ चार किलोमीटर अंतरावर आहे. या भागातून वारकरी दिंड्या आषाढी यात्रेसाठी पायी मार्गस्थ होतात.

त्यामुळे वारकरी वर्गाची सुरक्षा ही सुद्धा महत्त्वाची आहे. मात्र या भागात अशा प्रकारचे कोणतेही नियोजन आढळून आलेले नाही.

वन विभागाचे कर्मचारी या भागात येऊन शेतकऱ्यांचे प्रबोधन करत आहेत. अनेक ठिकाणी त्यांनी पिंजरे ही लावले आहेत. या पिंजऱ्यात मात्र आतापर्यंत बिबट्या अथवा अन्य कोणताही प्राणी अडकला नाही. शनिवारी रात्री ११ वाजता बिबट्याने व्होळे येथे एका कलवडीस मारले आहे. तीन आठवड्यापासून या भागातील शेतकरी दहशतीखाली वावरत आहेत. सतत बिबट्याचे हल्ले सुरुच आहेत. या परिसरात तरस हा प्राणी ही सतत आढळून येतो.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांना बिबट्या सदृश्य प्राण्याचे ठसे आढळून आलेले आहेत. त्याच प्रमाणे वाघोटी हा हिंस्र प्राणीही या भागात असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. किमान चार हिंस्र प्राणी या भागात असण्याची शक्यता आहे. या भागातील ज्ञानदेव परांडे यांनी स्वतः बिबट्या पाहिल्याचे ते सांगतात. वन विभागास मिळालेले पावलांचे ठसे हे बिबट्या सुदृश्य प्राण्याचे असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

वन विभागाकडून ड्रोनचा वापर ही करण्यात येत आहे. मात्र आतापर्यंत ड्रोनमध्ये कोणताच प्राणी दिसून आलेला नाही. वन विभागाकडून मात्र वारंवार शेतकरी वर्गास सावधानतेचे आवाहन करण्यात येत आहे.

**ट्यामुळे जीवन विस्कळीत**

व्होळे खुर्द हा पंढरपूर वारी क्षेत्रातील भाग आहे. त्यामुळे बिबट्याचा बंदोबस्त लवकर केला पाहिजे. शेतात जाताना शेतकरी वर्गात भीतीचे वातवरण आहे. कामाला मजूर भेटत नाहीत. लहान मुलांना शाळेत एकटे पाठवणे सुध्दा घातक आहे. आमचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.

**– औदुंबर पाटील,** व्होळे खुर्द

**सावधगिरी बाळगण्याचे आवाहन**

उजनी माढा, पालवन, व्होळे येथे प्रत्यक्ष जावून पाहणी केली आहे. या ठिकाणी आढळून आलेले ठसे हे बिबट्या सदृश्य प्राण्याचे आहेत. ड्रोनने तपासणी सुरु आहे. परिसरातील नागरिकांची जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**– वनपाल बाळासाहेब लटके**

# शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करावी



**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):–** ब्राझील येथील शेतकरी कसे आधुनिक पद्धतीने शेतीत काम करीत आहेत. ऊस उत्पादक शेतकरी कसा उभा राहिला पाहिजे. या बाबतीत एखादी पुस्तिका किवा माहितीपट तयार करून आपल्या भागात त्याचा उपयोग व्हावा, असे मत माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांनी व्यक्त केले.

आमदार अभिजित पाटील यांनी नुकताच ब्राझील येथे शेतीविषयक अभ्यास दौरा केला. यावेळी त्यांची भेट घेण्यासाठी मंगळवेढा येथील राष्ट्रवादीचे तसेच शेतकरी गेले असता ते बोलत होते.

सुरुवातीला आमदार अभिजित पाटील यांनी ब्राझील येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या कामाच्या पद्धती आणि कृषी तंत्रज्ञान बाबत केलेली पाहणी व त्या बद्दलचे अनुभव सांगितले. यावेळी ढोबळे यांनी मंगळवेढ्यातील शेतकऱ्यांना देखील सर्व जिल्हा परिषद व पंचायत समिती गटातील शेतकरी एकत्र करून एखादा शेतकरी मेळावा घेऊन मार्गदर्शन करावे, असे आवाहन केले. औदुंबर अण्णा पाटील यांच्या दूरदृष्टीने घेतलेल्या निर्णयाने शेतकरी समाधानी असल्याचे दिसून येते. तोच वारसा आपण पुढे घेऊन जात शेतकऱ्याना न्याय द्यावा. तसेच उजनी धरणातून पाणी मिळावे. यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी पुढाकार घेतला. शेतकऱ्यांच्या शेतात विठ्ठल पोहचला याची आता सेवा घडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी काँग्रेस मतदारसंघ अध्यक्ष मारुती वाकडे, उपसा सिंचन पाणी संघर्ष समितीचे पांडुरंग चौगुले, पांडुरंग जावळे, अण्णा शिरसाट, संदेश काळंगे, ज्ञानेश्वर कोंडूभैरी आदी उपस्थित होते.

# सोलापूर शहरातील काही भागात तीन दिंवसांआड पाणीपुरवठा सुरू


**सोलापूर(कटूसत्य वृत्त):–** उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनीची चाचणी प्रक्रिया पूर्ण झाली असून शहरातील काही भागाला तीन दिवसांआड पाणीपुरवठा करण्याचा प्रयोग महापालिका प्रशासनाने सुरू केला आहे. महिनाभरानंतर शहरातील उर्वरित भागांमध्ये पाच ऐवजी चार दिवसांआड पाणीपुरवठ्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाने शहरातील काही भागात १ जुलैपासून चार ऐवजी तीन दिवसांआड पाणीपुरवठा करण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार सोमवापासूनच शहरातील सुमारे, ४० टक्के भागात तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पाणीपुरवठ्याच्या वेळेत अर्धा तासाने कपात करण्यात आली आहे. चार ऐवजी साडेतीन तास पाणीपुरवठा केला जात आहे. साधारणतः महिनाभर हा प्रयोग केला जाणार आहे. त्यानंतर शहरातील उर्वरित ६० टक्के भागात पाच ऐवजी चार दिवसांआड पाणीपुरवठा करण्यात दिवस कमी करण्याचा येणार आहे. टप्प्याटप्प्याने एक प्रयत्न होणार आहे. शहरातील सिध्देश्वर पेठ, कुचन नगर, तेलंगी पाच्छा पेठ, राहुल गांधी झोपडपट्टी, पद्मशाली चौक, जमखंडी पूल परिसर, बुधवार बाजारचा काही भाग, सतनाम चौक, कुंभार गल्ली, १४ नंबर शाळा परिसर या परिसरात २६ जून रोजी पाणीपुरवठा झाला होता. या भागाला पुन्हा ३० जून रोजी पाणी देण्यात आले. या परिसरात पाणीपुरवठ्याचा पुढचा टप्पा ४ जुलै रोजी असणार आहे.

**एक दिवस कमी होईल : चौबे**

शहरातील ज्या भागाला चार दिवसांआड पाणीपुरवठा आहे तिथे तीन दिवसांआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन गेल्या दहा दिवसांपासून सुरू आहे. त्याची अंमलबजावणी ३० जूनपासून करण्यात आली आहे. या प्रकारे टप्प्याटप्प्याने सर्व भागात एक दिवस कमी होईल, असे सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांनी सांगितले.

# आता शहराला तीन दिवसाआड पाणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–**सोलापूर शहरातील नागरिकांसाठी गुड न्यूज आहे. शहराला तीन दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. दोन टप्प्यामध्ये तीन तासाऐवजी अडीच तास पाणीपुरवठा केला जाणार आहे. नागरिकांचा प्रतिसाद पाहून शहरातील इतर भागात या प्रयोग केला जाणार असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.शहरातील काही भागात पाच दिवसाआड तर काही भागात चार दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. पाणीपुरवठा करणाऱ्या तीन स्त्रोतांमध्ये मुबलक पाणीसाठा आहे. त्याशिवाय पाण्याची मागणी कमी झाली आहे. सध्या उजनी – सोलापूर दुहेरी जलवाहिनीची चाचणी पूर्ण झाली आहे. चार पंप कार्यान्वित करण्यात आले



आहेत. चार पंप पूर्ण क्षमतेने १७० एमएलडी पाणी उपसा करत आहेत. त्यामुळे शहराला एक जुलैपासून तीन दिवसाआड तर काही भागात चार दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे नियोजन सार्वजनिक आरोग्य अभियंता विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. पाणी उपसाही पूर्ण क्षमतेने होत आहे. फ्लो मीटरवर दररोज १७० एमएलडी पाणी उपसा होत असल्याची नोंद आहे. सध्या शहराला तीन तास पाणी दिले जात आहे. या पाण्याचे तास कमी करून ज्या भागात चार दिवसाआड पाणी येते त्या भागाला तीन दिवसाआड तर ज्या भागात पाच दिवसाआड पाणीपुरवठा आहे. त्या भागाला चार दिवसाआड पाणीपुरवठा केला जाणार आहे.

या निर्णयाची अंमलबाजावणी १ जुलैपासून केली जाणार आहे. या निर्णयामुळे आता घरातील नळाला तीन तासा ऐवजी दोन ते अडीच तास पाणी येणार आहे. या निर्णयामुळे पाण्याचा एक दिवस आणि अधार्तास पाणी कमी होणार आहे.

**उपलब्ध पाणीसाठा**

औज बंधाऱ्यांतून ११० एमएलडी, उजनी सोलापूर जुनी लाईन ९० एमएलडी उजनी सोलापूर समांतर पाईपलाईन १७० एमएलडी, हिप्परगा तलाव १० एमएलडी असा पाणीसाठा शहरासाठी दररोज ३८० एमएलडी पाणीसाठा उपलब्ध होतो.

एका व्यक्तीला दररोज १३५ लिटर पाणी

प्रति दिन प्रति माणसी १३५ लिटर पाणी द्यावे, असा नियम आहे. एका परिवारात आई, वडील आणि दोन मुले असे चार सदस्य गृहीत धरल्यास प्रति माणसी १३५ लिटर प्रमाणे प्रत्येक घरास ५४० लिटर पाणी द्यावे लागते. शहराची लोकसंख्या ११ लाखांच्या आसपास गृहीत धरल्यास उपलब्ध पाणीसाठा आणि दिले जाणारे पाणीसाठा मध्ये मोठी तफावत दिसून येते.

# शहरातील परिमंडळ नवीन रास्तभाव दुकानाबाबत जाहिरनामा प्रसिध्द

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** शासनाचे धोरण दरवर्षी सध्याची रास्तभाव दुकाने/किरकोळ करोसीन परवाने तसेच ठेवून, आजमितीस रद्द असलेली व यापुढे रदद होणारी, राजीनामा दिलेली व लोकसंख्या वाढीमुळे द्यावयाची नवीन तसेच विविध कारणांमुळे भविष्यात द्यावयाची नवीन रास्त भाव दुकाने मंजूर करण्यात यावीत.

सदरील शासन धोरणानुसार अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी सोलापूर शहरामधील सर्व परिमंडळ अधिकारी यांना लेखी पत्र देऊन जाहिरनामा प्रसिध्द करणे बाबतची विहीत नमुन्यातील माहिती मागविण्यात आली होती. सदर प्राप्त माहितीच्या आधारे अन्नधान्य वितरण अधिकारी सोलापूर यांनी जिल्हाधिकारी यांची नवीन जाहिरनामा प्रसिध्दीकरणास परवानगी घेऊन दि. 30 जुन 2025 रोजी खालील ठिकाणी नवीन दुकान मंजूरीसाठी जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर जाहिरनामा पाहणेसाठी सर्व परिमंडल अधिकारी सोलापूर शहर व अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

तरी सर्व इच्छूक महानगरपालिका (महानगरपालिका व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था), नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गट, नोंदणीकृत सहकारी संस्था, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम किंवा संस्था नोंदणी अधिनियम या कायद्याच्या अंतर्गत नोंदणी झालेल्या संस्था, महिला स्वयंसहाय्यता बचत गट व महिलांच्या सहकारी संस्था यांनी विहीत नमुन्यात संबंधित परिमंडल अधिकारी सोलापूर शहर यांचे कार्यालय येथे दिनांक : 01 जुलै 2025 पासून 31 जुलै 2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत स्वतः सादर करावेत. सदरील अर्ज परिमंडल अधिकारी कार्यालय सोलापूर शहर येथे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. त्याचे शुल्क घेऊन अर्ज संबधितास उपलब्ध होतील.

**रास्तभाव धान्य /शिधावाटप दुकान जाहिरनामा सन 2025**

परिमंडळ कार्यालय– परिमंडळ अ विभाग सोलापूर शहर – दुकाने शुक्रवार पेठ व बुधवारपेठ– एकूण संख्या 2

परिमंडळ ब विभाग सोलापूर शहर दुकाने झगुरूवार पेठ व पूर्व मंगळवार पेठ एकुण संख्या–2

एकुण दुकाने – 04

अशी माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर यांनी दिली आहे.

# लोकमंगल कृषी महाविद्यालयात महाराष्ट्र कृषी दिन उत्साहात साजरा

**वडाळा (कटूसत्य वृत्त):–** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित, लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत दिनांक १ जुलै रोजी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतरावजी नाईक यांची जयंती अर्थात कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाची सुरुवात माजी मुख्यमंत्री महाराष्ट्राचे हरितक्रांतीचे जनक स्व. वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमा पुजनाने झाली.

सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे कृषी अर्थशास्त्र विभागाचे विभाप्रमुख प्रा. नवनाथ गोसावी यांनी भूषविले. कृषी दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मौजे. आळगे तालुका. अक्कलकोट, जिल्हा. सोलापूर येथील प्रगतशील शेतकरी संगप्पा हत्तुरे हे लाभले होते. यानंतर कार्यक्रम अध्यक्षांच्या हस्ते प्रमुख अतिथींचा रोप भेट देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. संगाप्पा हत्तुरे पाटील यांच्या हत्तुरे ॲग्रो सायन्स शेतकरी उत्पादक कंपनी मार्फत देशी गाईपासून सेंद्रिय खते, जीवामृत



आणि तसेच पशुंकरिता पशु खाद्य निर्मिती केली जाते. उपस्थित विद्यार्थ्यांना संबोधित करताना संगप्पा हत्तुरे यांनी वसंतरावजी नाईक साहेबांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाचा उल्लेख केला आणि त्यांच्याच विचाराला अनुसरून शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत सुरू असणाऱ्या विविध बाबींविषयी सखोल माहिती दिली. यावेळी त्यांनी कंपनीमार्फत तयार केले जाणाऱ्या सदाबहार जातीच्या पेरू रोपांच्या लागवड पद्धतीविषयी सविस्तर माहिती दिली. या नंतर अध्यक्षीय मनोगतामध्ये प्रा. नवनाथ गोसावी यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री नाईक साहेबांच्या कृषी क्षेत्रातील अतुलनीय कार्याविषयी विस्तृत मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त महाविद्यालयाच्या प्रांगणात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सदरील कार्यक्रमास हत्तुरे ॲग्रो सायन्स शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक दयानंद पाटील, सुरेश कोळी, विनायक जमादार आणि प्रगतशील शेतकरी अंबादास बिराजदार (सेंद्रीय शेती अभ्यासक), मासीद घुटाळे, प्रकाश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमाच्या आयोजनासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन व संपन्नतेसाठी कृषी अभियांत्रिकी विभाग प्रमुख प्रा. सुजाता चौगुले आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी कृषी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक – प्राध्यापिका वृंद आणि विद्यार्थ्यांची उल्लेखनीय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विद्यार्थी प्रतिनिधी कु.गणेश केदार याने केले.